# मोहोर



सध्या जगातील अनेक देश आर्थिकदृष्ट्या परस्परांशी जोडले गेले आहेत. भारतही या जागतिक अर्थव्यवस्थेचा एक भाग आहे. ब्रिटनमध्ये हुजूर पक्षाचे सरकार सध्या सत्तेवर येणे फायदेशीर ठरेल, असे तरी सध्या दिसते आहे. ब्रिटनमधील भारतीय वंशाचे बहुतांशी हिंदू मतदार आहेत. त्यांची संख्या दहा लाखांच्या आसपास असल्याचे सांगण्यात येते. कॉर्बिन यांच्या उघड पाकिस्तानवादी भूमिकेमुळे हा मतदार सजग झाला आणि त्याने मोठ्या प्रमाणावर जॉन्सन यांच्या पक्षाला मतदान केले. मजूर पक्षाची सहा टक्क्यांहून जास्त मते घसरली आहेत. त्यांना सर्वात कमी आशियाई मते पडल्याने त्यांना फटका सहन करावा लागला आहे. ब्रिटनमधील हिंदू मतदार आता तेथील राजकारणात आपली ठळक भूमिका बजावू लागला आहे.

प्रसाद केरकर
चिंतन
९८६७७२१११०

## ब्रेक्झिटवर शिक्कामोर्तब



ब्रिटनचे लागलेले निकाल पाहता पंतप्रधान बोरिस जॉन्सन यांची मध्यावधी निवडणुकांचा घेतलेला निर्णय त्यांना चांगलाच फळला आहे, तसेच ब्रेक्झिटवर आता शिक्कामोर्तब झाले आहे. त्यामुळे ब्रिटनचे लागलेले हे निकाल युरोपियन महासंघावर परिणामकारक ठरणार आहेत. ब्रिटनमधील हुजूर पक्षाला तेथील प्रतिनिधीगृहाच्या ६५० स्थानांपैकी ३६५ स्थानांवर विजय मिळाला असून, मजूर पक्षाला अवघ्या २०३ जागांवर समाधान मानावे लागले. मतांची टक्केवारी आणि स्थाने या दोन्ही दृष्टींनी हुजूर पक्षाला १९८७ पासूनचे सर्वात मोठे यश मिळाले. तर मजूर पक्षाच्या वाट्याला १९३५ पासूनची सर्वात मोठी घसरण आली. आजवर तेथील भारतीय व एकूणच आशियाई समाज हा मजूर पक्षाच्या बाजूने ठामपणे उभा राहिलेला असे. मात्र, यावेळी हे चित्र नेमके पलटले आहे. गेल्या वेळच्या निवडणुकीत ज्या ३० आशियाईंचा प्रभाव असलेल्या मतदारसंघात मजूर पक्षाचे उमेदवार विजयी होत, ते चित्र यावेळी नाही. त्यामुळे हुजूर पक्षाच्या विजयात तेथील आशियाई समाजाचा मोठा वाटा आहे, असे म्हणता येईल. युरोपीयन महासंघातून बाहेर पडण्याच्या जॉन्सन यांच्या धोरणाला मिळालेला हा निर्णायक जनादेश आहे. आता अखेर महासंघातून बाहेर पडण्याच्या हालचाली वेगने होऊ शकतील. २020 च्या मध्यापर्यंत ब्रिटनला महासंघापासून पूर्णपणे बाहेर पडलेले दिसेल. मागच्या निवडणुकीतही हुजूर पक्ष सर्वात मोठा असला, तरीही स्पष्ट बहुमतापेक्षा त्याला आठ जागा कमी होत्या. त्यामुळे त्यांना मित्रपक्षांवर अवलंबून राहावे लागले होते. ब्रेक्झिटच्या मुद्द्यावर या मित्रपक्षांमध्ये मतभेद असल्याने निर्णयप्रक्रिया रेंगाळली होती. आता जॉन्सन यांच्या नेतृत्वाखाली हा विजय संपादन झाल्याने त्यांचा पक्षांतर्गत प्रभाव वाढला आहे. साहजिकच, ते आपली धोरणे विनासायास राबवू शकतात. त्यामुळे आता ब्रेक्झिट ही काळ्या दगडावरची पांढरी रेघ आहे. यावेळी भारतीय मतदार हा मजूर पक्षाच्या नेतृत्वावर नाराज होता. त्याला काही महत्त्वाची कारणे आहेत. मजूर पक्षाचे नेते जेरेमी कॉर्बिन हे पाकिस्तान समर्थक म्हणून ओळखले जातात. त्यांच्या मतदारसंघात पाकिस्तानी वंशाच्या मतदारांची संख्या लक्षणीय असल्याने त्यांना निवडून येण्यासाठी त्यांच्या मतांची आवश्यकता असते. ब्रिटनमध्ये अन्य काही ठिकाणीही ही मतपेढी असल्याने तिला खूष ठेवण्यासाठी कॉर्बिन काश्मीरसारख्या संवेदनशील मुद्द्यावर उघडपणे पाकिस्तानची बाजू घेतली होती. निवडणुकीपूर्वी मजूर पक्षाने एक प्रस्ताव संमत करून काश्मीरसंबंधी भारतावर अनेक गलिच्छ आणि खोटारडे आरोप केले होते. भारत काश्मीरमधील महिलांवर हेतुपुरस्सर अत्याचार करीत आहे, असेही मजूर पक्षाचे म्हणणे होते. आपण पंतप्रधान झाल्यास सर्वप्रथम काश्मीरप्रश्नाची हाताळणी करू, असे



भारताचा उपमर्द करणारे आणि पाकिस्तानच्या आशा पल्लवित करणारे विधान कॉर्बिन यांनी केले होते. त्यामुळे कॉर्बिनच ब्रिटनचे पंतप्रधान व्हावेत, अशी इच्छा पाकिस्तानने व्यक्त केली होती. साहजिकच, भारत या निवडणुकीवर सावधपणे दृष्टी ठेवून होता. जर मजूर पक्ष सत्तेत आला असता, तर भारतासाठी ते काही शुभचिन्ह नव्हते. तसेच त्यांच्या भारतविरोधी कारवायांमुळे तेथील मूळ भारतीयांनी त्यांनाच मते नाकारुन चाप लावला. ही भारतासाठी सकारात्मक बाब होती. त्याउलट, भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि जॉन्सन यांचे संबंध मैत्रीपूर्ण आहेत, असे बोलले जाते. जॉन्सन यांना भारताच्या काश्मीर धोरणांविषयी सहानुभूती आहे व जॉन्सन हे भारताचे मित्र आहेत, असा संदेश तेथील भारतीयांमध्ये पोहोचविण्यात आला होता. तसेच ब्रिटन युरोपियन महासंघातून बाहेर आल्यानंतर भारत आणि ब्रिटन यांच्यात विस्तृत व्यापार करार होऊ शकतो. याचा भारताला व्यापार समृद्ध करण्यासाठी मोठा उपयोग होईल, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. पाकपुरस्कृत दहशतवादासंबंधीही जॉन्सन आणि मोदी यांच्यात एकवाक्यता आहे. आपण पंतप्रधान झाल्यास आणि बेक्झिटमधून बाहेर पडल्यानंतर भारताला युरोपियन महासंघातील देशासारखा दर्जा दिला जाईल, असे आश्वासक विधान जॉन्सन यांनी निवडणूक प्रचारात केले होते. आता ते काय करतात, ते पाहावे लागेल. सध्या जगातील अनेक देश आर्थिकदृष्ट्या परस्परांशी जोडले गेले आहेत. भारतही या जागतिक अर्थव्यवस्थेचा एक भाग आहे. ब्रिटनमध्ये हुजूर पक्षाचे सरकार सध्या सत्तेवर येणे फायदेशीर ठरेल, असे तरी सध्या दिसते आहे. ब्रिटनमधील भारतीय वंशाचे बहुतांशी हिंदू मतदार आहेत. त्यांची संख्या दहा लाखांच्या आसपास असल्याचे सांगण्यात येते. कॉर्बिन यांच्या उघड पाकिस्तानवादी भूमिकेमुळे हा मतदार सजग झाला आणि त्याने मोठ्या प्रमाणावर जॉन्सन यांच्या पक्षाला मतदान केले. मजूर पक्षाची सहा टक्क्यांहून जास्त मते घसरली आहेत. त्यांना सर्वात कमी आशियाई मते पडल्याने त्यांना फटका सहन करावा लागला आहे. ब्रिटनमधील हिंदू मतदार आता तेथील राजकारणात आपली ठळक भूमिका बजावू लागला आहे. धार्मिक मुद्द्यावर ब्रिटनमधील सजग असलेला मतदारही मतदान करु लागल्याबद्दल आश्चर्य वाटेलही, पण ही वस्तुस्थिती आहे. एकंदरीत, भारतीय दृष्टिकोनातून पाहिल्यास ती समाधानकारक बाब ठरली आहे. ब्रिटनमधील जनतेचा हा कौल युरोपीयन राजकारण, अर्थकारणाचा रंग बदलणारा ठरणार आहे. दीर्घकालीन विचार करता हे ब्रिटनच्या हिताचे नाही, त्यांना सध्या अल्पकालीन फायदे दिसत आहेत. तेथील बेकारी, घसरती अर्थव्यवस्था यावर ब्रिक्झिट उपायकारक आहे, असे तेथील जनतेला आज वाटते आहे, पण तो त्यांचा भ्रम आहे. अर्थात, हे काळ सिद्ध करील. ■

---

**एकीकडे सावरकरांना भारतरत्न देण्यात यावे, अशी मागणी भाजप आणि शिवसेनेनेही केली आहे. मात्र, 'द वीक' या नियतकालिकाने दिलेल्या माहितीच्या आधारे सावरकरांनी शिक्षेतून माफी मिळण्यासाठी वारंवार स्वत: एकूण सात दया याचिका केल्या आणि पत्नीमार्फत तीन माफीचे अर्ज केले असं दिसतं. इतिहासाच्या पानांमध्ये दडलेले हे पुरावे कागदपत्रांच्या आधारे पुढे आणण्यात आले आहेत. आणि, याच पात्रांच्या आधारे सावरकरांना माफीवीर म्हटलं जातं. राहुल गांधींचं सावरकरांविषयीचं वाक्य केवळ या वस्तुस्थितीवर आधारित होतं.**

## गांधी आणि सावरकर

कटाक्ष
जयंत माईणकर
९८२१९१७१६३

गांधी आणि सावरकर! भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील वैचारिकतेची दोन टोकं! एक अहिंसेचे पुजारी तर दुसरे रणावीण कोणा स्वातंत्र्य मिळाले, या उक्तीवर विश्वास असणारे! एक राष्ट्रपिता तर दुसरे हिंदुत्वाचे प्रणेते! फाळणीनंतर पाकिस्तानला ५५ कोटी रुपये दिल्यामुळे चिडलेल्या आणि सावरकरभक्त असलेल्या नथुराम गोडसेंनी महात्मा गांधींचा खून केला. खुद्द सावरकर गांधीहत्येमध्ये आरोपी होते. पण, पुढे सर्वोच्च न्यायालयाने त्यांची मुक्तता केली. मात्र, तेव्हापासूनच या दोन्ही नेत्यांच्या समर्थकांमध्ये एक दरी उत्पन्न झाली, ती आजही कायम आहे. पण, आज हिंदुत्ववादी सरकार देशात सत्तेवर असताना आणि त्यातही त्या पक्षातील साध्वी प्रज्ञा सिंग यांच्यासारख्या खासदार नथुराम गोडसेला देशभक्त म्हणत असताना ही दरी जास्त वाढत जात आहे, नव्हे तर देशाच्या एकतेला धोका निर्माण करत आहे. इतिहासाला केवळ इतिहास म्हणून पाहायचं आणि त्याचा संबंध भावनिकदृष्ट्या सद्यःपरिस्थितीशी जोडायचा नाही, अशी रास्त भूमिका घेताना आम भारतीय, राजकीय पक्ष दिसत नाही.

सावरकरांना काळ्या पाण्याची शिक्षा झाली होती. त्यांना 'वीर' हे विशेषण १९२० मध्ये प्रथम लावण्यात आले. 'भाला'कार भोपटकरांनी ते पहिल्यांदा वापरले. आणि, ते रुढ झाले. अगदी आजसुद्धा त्यांना स्वातंत्र्यवीर सावरकर म्हणूनच ओळखले जाते. परंतु, सावरकरांच्या अस्सल कागदपत्रांच्या आधारे सावरकर हे 'स्वातंत्र्यवीर' नव्हे, तर 'माफीवीर' असल्याची मांडणी केली जाते. 'द वीक' या देशातील इंग्रजी नियतकालिकाने जानेवारी २०१६ मध्ये यासंदर्भातील माहिती पुढे आणली आहे. ती ऐतिहासिक कागदपत्रांच्या आधारे मांडली आहे.

केंद्रात अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखाली एनडीएचे सरकार असताना २००३ मध्ये संसदेच्या सेंट्रल हॉलमध्ये सावरकरांचे तैलचित्र लावण्यात आले. महात्मा गांधींच्या तैलचित्राच्या अगदी समोर. भारतीय संसदेच्या इतिहासात काँग्रेस आणि इतर विरोधकांनी बहिष्कार घातलेला हा एकमेव समारंभ आहे. आणि, जरी पोस्टाचं तिकीट काढून इंदिराजींनी सावरकरांबद्दल आदर व्यक्त केला असला, तरीही तात्विक मतभेद कायम राहिले. आणि, तेच मतभेद २००३ साली संसदेत सावरकरांच्या तैलचित्र अनावरणप्रसंगी बहिष्कार घालून काँग्रेसने दाखवून दिले.

भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष अमित शहा यांनी आपल्या वेबसाइटचे अनावरण झाले, तेव्हा त्यांनी पहिला ब्लॉग सावरकरांना अर्पण केला. यावरुन लक्षात येते, की ते भाजपवाल्यांना प्रिय आहेत.

पण मग प्रश्न राहतो हिंदू महासभा असताना आणि सावरकरांसारखे नेते असतानासुद्धा, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला जनसंघ हा राजकीय पक्ष काढण्याची गरज का पडली? कारण, सावरकरांचं विज्ञाननिष्ठ जातीविरहीत हिंदुत्व चातुर्वर्ण्य व्यवस्थेवर विश्वास ठेवणाऱ्या गोळवलकर गुरुजींना पचनी पडणारं नव्हतं. सावरकर गायीला माता न म्हणता प्राणी मानत आणि गोहत्येला त्यांचा विरोध नव्हता. याउलट,



केवळ गायीचं नव्हे, तर केंद्र सरकारने गोवंश हत्याबंदी केली आहे. अर्थात, सावरकरांचं विज्ञाननिष्ठ हिंदुत्व बुरसटलेल्या, जुनाट विचारसरणीच्या संघनिष्ठ लोकांना मानवणारे नव्हते.

एकीकडे सावरकरांना भारतरत्न देण्यात यावे, अशी मागणी भाजप आणि शिवसेनेनेही केली आहे. मात्र, 'द वीक' या नियतकालिकाने दिलेल्या माहितीच्या आधारे सावरकरांनी शिक्षेतून माफी मिळण्यासाठी वारंवार स्वत: एकूण सात दया याचिका केल्या आणि पत्नीमार्फत तीन माफीचे अर्ज केले असं दिसतं. इतिहासाच्या पानांमध्ये दडलेले हे पुरावे कागदपत्रांच्या आधारे पुढे आणण्यात आले आहेत. आणि, याच पत्रांच्या आधारे सावरकरांना माफीवीर म्हटलं जातं. राहुल गांधींचं सावरकरांविषयीच वाक्य केवळ या वस्तुस्थितीवर आधारित होतं. पण, वैचारिक मतभिन्नता असूनही स्व. पंतप्रधान इंदिरा गांधींनी सावरकरांच्या नावानी टपाल तिकीट प्रकाशित केलं होतं, तर दुसरे माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी काँग्रेसचा सावरकरांच्या हिंदुत्वाला विरोध आहे, सावरकर या व्यक्तीला नाही, असं नुकतंच म्हटलं होतं. काळ्या पाण्याच्या शिक्षेत त्यांचा भाऊ बाबाराव हेसुद्धा त्यांच्यासोबत तुरुंगात होते. सावरकर विरोधकांचे आणखी एक म्हणणे असे, की माफी मागणाऱ्या सावरकरांना भारतरत्न द्यायचे असेल, तर फासावर गेलेल्या भगतसिंग-राजगुरु यांच्यासह अनेक वीरांचा अपमान ठरतो. महाराष्ट्रात शिवसेनेसह राष्ट्रवादी-काँग्रेसने सरकार स्थापन केल्यानंतर भाजपने आपल्या जुन्या मित्राला सावरकरांच्या मुद्द्यावरुन घेरण्याचा प्रयत्न केला आहे. कारण, याआधी स्व. बाळासाहेब ठाकरे यांचा सावरकरांचा अपमान करणाऱ्या मणीशंकर अय्यर यांना जोड्याने मारण्याचं आवाहन केलं होतं. लोकसभेत राहुल गांधींनी माफी मागावी, ही मागणी भाजपद्वारे केली गेली, तर माफी मागायला आपण सावरकर नाही, गांधी आहोत, असं उत्तर दिल्याने एक नव्या वादाला तोंड फुटले आहे. महाराष्ट्रात भाजप हा मुद्दा अधिकाधिक पेटवून भाजप शिवसेनेला आपल्याकडे परत आणण्याचा किंवा कोंडीत पकडण्याचा प्रयत्न करीत आहे.

तर देशपातळीवर नागरिकत्व विधेयक, समान नागरी कायदा यासारखे मुद्दे आणि त्याच्या जोडीला सावरकरांचा मुद्दा घेऊन बहुसंख्य हिंदू समाजाची मते आपल्या बाजूने वळविण्याचा प्रयत्न करताना दिसत आहेत. एका बाजूला जगाला शांतीचा संदेश देणारे महात्मा गांधी, तर दुसऱ्या बाजूला हिंदुत्वाचे जनक सावरकर. जशी सावरकरांची माफीपत्रे तशीच त्या पत्रातील भाषा. आपण आणि आपले समर्थक इंग्रजांचं सहकार्य करू, हे त्यांनी पत्रात वारंवार नमूद केलं आहे. एकूणच, संघ आणि उजव्या विचारसरणीच्या लोकांवर ब्रिटिशांना मदत केल्याचा आरोप इथेही सिद्ध होताना दिसतो.

उजव्या विचारणीचे बहुसंख्याक नेहमी स्वतःच्या तथाकथित वाईट परिस्थितीला एखाद्या अल्पसंख्याक समाजाला जबाबदार धरतात. जर्मनीमध्ये हिटलरने ज्यू समाजाला टार्गेट केलं, तर भारतात संघ परिवार मुस्लिम समाजाला टार्गेट करीत आहे. राम मंदिर, कलम ३७० हटवणे, तिहेरी तलाक, नागरिकत्व सुधारणा कायदा यामध्ये आज भारतात २० कोटींच्या आसपास असलेल्या मुस्लिम समाजालाच सतत डोळ्यासमोर ठेवलं जातं. हिंसा हा उजव्या विचारसरणीच्या लोकांचा, अर्थात सावरकरांना मानणाऱ्या हिंदुत्ववाद्यांचा स्थायी भाव आहे, तर दुसऱ्या बाजूला अहिंसेचे पुजारी आहेत. राम मंदिर उभारणीसाठी आतापर्यंत १०,००० लोकांचा बळी गेला आहे. पण, केवळ या आंदोलनामुळेच संघाच्या मुशीतून एयर झालेले दोन पंतप्रधान मिळाले आहेत. त्यामुळे एक प्रकारे संघ परिवार आपल्या कामात यशस्वी ठरले आहेत. आता एक प्रकारे सावरकर विरुद्ध गांधी असं स्वरूप या वादाला देऊन, संघ परिवार बहुसंख्याक हिंदू समाजाच्या भावनेला हात घालत आहे. आपल्याला विरोध करणाऱ्यांना ही मंडळी देशद्रोही म्हणण्यास मागे-पुढे पाहात नाहीत. एकूण स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ७२ वर्षांनी फाळणीस जबाबदार कोण, याविषयी ऐतिहासिक दस्तऐवज न पाहता भावनिक चर्चा केली जाते. स्वातंत्र्यपूर्व काळात सिंधमध्ये हिंदुमहासभेने मुस्लिम लीगशी युती केली होती, ही वस्तुस्थिती जाणीवपूर्वक दुर्लक्षित केली जाते. केवळ महात्मा गांधी, नेहरू आणि काँग्रेसला फाळणीस जबाबदार धरून सावरकरांच्या आडून आपली गठ्ठा मते वाढवण्याचा हा भाजप आणि संघ परिवाराचा प्रयत्न आहे. तूर्तास इतकेच! ■

---

**वर्षअखेरीला सरत्या वर्षाचा जमा-खर्च तपासताना सर्व संत-महात्म्यांनी पुरस्कारलेली संयत जीवनशैली विशेष आठवणीत आहे. त्याचे स्मरण ठेवून नाताळ साजरा करताना जल्लोष आणि उत्साहाच्या चैतन्याबरोबरच येशूने दिलेला शांती आणि क्षमाशीलतेचा संदेश विशेष औचित्यपूर्ण वाटतो. ही निर्मळ जीवनतत्त्वे जीवनेच्छा नक्कीच ऊबदार बनवतील. म्हणूनच येशूच्या संदेशातून वर्तमानातील अनेक आव्हानांचा मेळ घालता येईल, असे वाटते.**

## सामाजिक शांततेचा जल्लोषोत्सव!

विशेष
शैला हळबे







थंडीच्या आगमनाने जगण्याची झिंग अधिक गहिरी झालेली दिसते. घरातल्या बाळगोपाळांच्या अवखळ लीलाही थंडीच्या सहवासात शिगेला पोहोचतात. पुन्हा डिसेंबर महिन्याला मार्गशीर्षाची साथ! मराठी महिन्यातलं सगळं पवित्र या मार्गशीर्षात साठवलंय, असं म्हणतात. मग लक्ष्मीव्रतासारख्या व्रतवैकल्यांना उधाण येतं ते याच दिवसात! या महिन्याच्या तारखा उलटत राहतात आणि चैतन्याची झळाळी अधिकच लकाकू लागते. या काळात दुकानं रंगीबेरंगी झगझगतं रुपडं लेवून चमकू लागतात.

'ख्रिसमस ट्री'ची लहान-मोठी शोभिवंत, खरी-खोटी रोपटी तिथे डौलात मिरवू लागतात. त्याची शोभिवंत चकमक लहान-थोरांना भुरळ घालते. रंगतदार कागदात आकर्षकपणे मांडलेल्या भेटवस्तू नजर खिळवून ठेवतात. काही ठिकाणी, लांबलचक दाढ्या असलेले, पांढऱ्या पोषाखातले, लाल, गोंडेदार टोप्या घातलेले सांताक्लॉज बालचमूला आकर्षित करतात. त्यांचा हात हातात घेऊन शेक हँड करण्याची अहमहमिका बालांमध्ये सुरु असते. केक्स-पेस्ट्रिजची दुकानं तर या दिवसातलं प्रमुख आकर्षण. ना ना तऱ्हेने सजवलेले केक्स भल्याभल्यांनाही वयाची बंधन तोडून दुकानासमोर खिळवून ठेवतात. फार कशाला, छोट्या पडद्यावरचे सारेच 'कुकरी शोज' या दिवसात खास केक्स-पेस्ट्रिजचा महोत्सव आयोजित करतात. मग काय, गृहिणींची धांदल उडते. वह्यांमध्ये रेसिपीज लिहून घेण्याची आणि त्या करून बघण्याची... डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यात ही एवढी उल्हसित पर्वणी कशासाठी, तर 'ख्रिसमस' म्हणजेच 'नाताळ'चा सण साजरा करण्यासाठी.

येशू ख्रिस्ताच्या नावाने साजरा होणारा नाताळ हा सण. वास्तविक, येशू ख्रिस्ताची जन्मभूमी आणि कर्मभूमी म्हणजे आजचं मध्य पूर्वेतलं पॅलेस्टाईन. पण, आजच्या सर्वधर्मसमभाव असणाऱ्या ग्लोबल युगात देश-धर्म यांच्या मर्यादा न मानता आपण सर्वांसमवेत आनंदाचे क्षण टिपण्यासाठी उत्सुक असतो. एक परीने छानच आहे. पण, हे साजीरे-गोजीरे क्षण वेचताना आपण त्यातले अन्यवार्थ लावून पाहायला हवेत. येशूच्या आधी दोन हजार वर्षांपूर्वीपासून त्या प्रदेशाला 'दुधा-मधाचा प्रदेश' असं म्हटलं जात असे. शांतताप्रिय, हुन्नरी लोकांचा हा प्रदेश. ऐसपैस कपडे, कानड्याच्या वस्तू तयार करणं, असे उद्योगधंदे तिथले लोक करत. त्या काळी त्या वस्तूंना आजूबाजूच्या प्रदेशातून प्रचंड मागणी होती. त्यामुळे हा देश जणू सुवर्णभूमीच होता. पण, जगाच्या नकाशात 'मोक्याची जागा' ठरल्यामुळे इथली सुख-शांती फार काळ टिकली नाही. परचक्र, अन्याय, अत्याचार सततचं शोषण-सत्र याला तिथली जनता तोंड देत राहिली. नरबळी, पशुबळीच्या प्रथा फोफावल्या आणि मग हतबल अशी तिथली जनता 'प्रेषितां'ची वाट पाहात राहिली. अशा अवघड परिस्थितीत त्यांचा तारक 'येशू' आला. त्याने आश्वासन दिलं, की 'मी नवा धर्म सांगायला आलो नाही तर 'जुना करार' पूर्ण करण्यासाठी आलो आहे. प्रत्येक संस्कृती, समाजात, धर्म, उत्थान-पतनाचं चक्र फिरतच असतं. आज आपली संस्कृती, समाज, देश या चक्राच्या कोणत्या टोकावर उभा आहे? •➤ पान १२ वर ■

# उद्योजक गजेंद्र दळी



अलिबाग नगराची महती वाढविणारी अनेक थोर मंडळी झाली आहेत. ज्यांच्यामुळे या शहराच्या प्रगतीमध्ये भर पडली आहे. विविध प्रकारचे कार्य करुन अशा मंडळींनी चांगली सेवा केली आहे. अशा व्यक्तींपैकी गजेंद्र दळी हे एक व्यक्तिमत्त्व आहे.

गजेंद्रशेठ दळी यांच्या वयाला आता पंच्याऐंशी वर्षे झाली आहेत. तरी तरुणाला लाजविल अशी कार्यतत्परता त्यांच्यामध्ये दिसून येते. म्हातारपणाची निशाणी त्यांच्या कामकाजात दिसून येत नाही. ते सतत कार्यरत असतात. ज्येष्ठ नागरिक संस्थेमध्ये ते हौसेने भाग घेतात आणि या संस्थेला चांगले व्यक्तिमत्त्व प्राप्त व्हावे म्हणून प्रयत्न करतात. ही ज्येष्ठ नागरिक संस्था अत्यंत तत्पर सेवा करणारी आहे. या संस्थेत गजेंद्रशेठ दळी यांचा मोठा वाटा आहे.



आठवण
डॉ. रमेश वार्डे

परवा ज्येष्ठ नागरिक संस्थेची सभा अरुणकुमार वैद्य माध्यमिक विद्यालयाच्या हॉलमध्ये झाली. या सभेत ज्यांच्या लग्नाला पन्नास वर्षे पूर्ण झाली आहेत अशा जोडप्यांचा सत्कार करण्यात आला. यामध्ये गजेंद्रशेठ दळी आणि सुधाताई दळी यांचा समावेश होता. या जोडप्याची जेव्हा सत्काराची पाळी आली, तेव्हा उभयता आनंदाने व्यासपीठावर आले आणि त्यांनी सत्कार स्वीकारला. त्यावेळी एक दृश्य फारच छान दिसून आले. ते म्हणजे सुधा दळी यांनी आपल्या पतीराजांना खाली वाकून नमस्कार केला. या मोठ्या सभेत एवढी नम्रता पाहून फारच छान वाटले. आपल्या पतीराजांच्या पाया पडण्यात, पायाला स्पर्श करण्यात धन्यता मानणाऱ्या या सेवाव्रती नारीचे कौतुक करु तेवढे थोडेच आहे. परंपरा सांभाळणारी ही नारी मुंबईची माहेरवासीण आहे, हे ही समजून आले, त्यामुळे मुंबईत राहून घाईगडबडीच्या शहरातील महिला हे पुढेच आहेच. पुढे आणखी समजले की, गजेंद्रशेठ दळी यांचे लग्न झाले, तेव्हा अलिबागमध्ये वीज नव्हती. रॉकेलच्या दिव्यावर व गॅस बत्तीवर व्यवहार चालत असत. अशा काळात अलिबागमध्ये सासरला मुंबईतून येणे म्हणजे आश्चर्यचा वाटेल; परंतु त्याची निवड योग्य होती, असे दिसून येते. गजूशेठ आपल्या पत्नीला बऱ्याच वेळी मुंबईत घेऊन जात असत आणि ग्रामीण भागाचा विसर पाडीत असत.

गजुशेठ जेव्हा वीस-बावीस वर्षांचे असतील, तेव्हा त्यांच्या वडिलांनी त्यांना १९६३ च्या दरम्यान वीस हजार रुपये दिले आणि अलिबागला टॉकीज सुरु कर असे म्हणाले. गजूशेठ तरुण होते. अनुभव नव्हता; परंतु ते अत्यंत हुशार व्यावसायिक म्हणून घडले असावे. त्यांनी त्यावेळी जे.पी. त्रिभुवन यांच्या सहकार्याने योग्य जागेची निवड करुन टुरींग टॉकीज काढली आणि अलिबागला सीमेला आला, हे मोठे वर्तमान घडले. त्या गोष्टीला आता ५६ वर्षे झाली आहेत. जेव्हा भारतीय सिनेमा दादासाहेब फाळके यांनी मुंबईत प्रथम आणला, त्या सिनेमाला पन्नास वर्षे झाली. तेव्हा म्हणजे १९६३ सालात अलिबागला सिनेमा गजूशेठ यांनी आणला आणि एका वेगळ्या वातावरणात अलिबागकरांचे पाऊल पडले. वीस हजारांत सुरु झालेला सिनेमा पुढे नावारुपाला आला. टुरिंग टॉकीजचे भव्य असे नमुनेदार आधुनिक साज असलेले असे सिनेमागृह गजेंद्रशेठ यांनी उभे केले. ते अत्यंत शिस्तीने चालविले. आपुलकीने चालविले, त्यामुळे या सिनेमागृहांबरोबर माणसे जोडली गेली.

पुढे चॅनेल आल्यावर मुंबईतील काही सिनेमागृहे बंद पडली. काही नव्याने पुन्हा उभी राहिली. या अलिबागच्या महेश सिनेमागृहावरही थोडा फार परिणाम चॅनेलचा झाला. व्ही.डी.ओ. सिनेमांचा परिणाम झाला. पण, तो तात्कालिक ठरला. गजूशेठ दळी यांनीही कंबर कसली आणि आपल्या महेश सिनेमागृहाला नवीन साज चढविला. नवीन आसने, नवीन सुविधा मिळवून दिल्या. अल्पोहाराची व्यवस्था केली आणि मग पुनः सिनेमा गती घेता झाला. मुंबईत आलेला चित्रपट इथेही त्याच वेळी सुरु असतो. त्यामुळे आपण मुंबईबरोबर असतो. आता अलिबागच्या सिनेमाला पन्नासपेक्षा जास्त वर्षे झाली आहेत. वडिलांनी दिलेल्या वीस हजारांच्या रकमेतून सुरु झालेली टुरींग टॉकीज नावारुपाला आली. गजेंद्रशेठ दळी यांचे इतरही व्यवसाय आहेत. प्रत्येक व्यवहार चोख असतो. त्यामुळे उद्योजक म्हणून त्यांनी अलिबाग परिसरात चांगले नाव मिळविले आहे.

गजेंद्रशेठ यांना लोकांना मदत करणे यात मोठेपणा वाटतो. त्यामुळे ते काहीना काही चांगले काम सतत करत असतात. एका शेतकरी बाईची जागा विद्यानगर परिसरात होती आणि त्या बाईने ती जागा विकायला काढली होती. यावेळी तिला चांगले गिऱ्हाईक मिळायला हवे होते. न पेक्षा ती या व्यवहारात फसण्याची शक्यता होती आणि तिचे नुकसान होणार होते. तेव्हा गजूशेठ यांनी एका गृहनिर्माण सोसायटीला ही जागा मिळवून दिली आणि व्यवहार पूर्ण करुन दिला. त्या बाईला तिच्या जागेचे पूर्ण पैसे मिळवून दिले. असे कार्य त्यांच्याकडून घडत असते. त्यांचा अलिबागमधील सांस्कृतिक कार्यक्रमात सहभाग असतो. लायन्स क्लबचे अनेक कार्यक्रम पार पाडण्यात त्यांचा मोठा सहभाग असतो. कोणत्याही संस्थेचा कार्यक्रम असला तरी ते सक्रीय असतात. कार्यक्रमात येणाऱ्या अडचणी सोडवितात. ज्येष्ठ नागरिक सभेचा मेळावा त्यांनी आपल्या वेश्वीच्या वाडीमध्ये अनेकदा घेतला आहे.

फार पूर्वी १९६३ सालात गजुशेठ यांच्यासोबत कलेक्टर यांचे पीए जॉन त्रिभुवन आणि हवालदार जानू सोबत होते. जानू हे शिकारीचे आवड असलेले होते. जॉन त्रिभुवनही बंदूक बाळगणारे शिकारी होते. परंतु, ते हौशी होते. हे तिघेजण एकदा शिकारीसाठी गावी आले असता ते माझ्याकडे मुक्कामाला होते. अंधाऱ्या रात्री आम्ही सारे शिकारीसाठी बाहेर पडलो; परंतु त्याचवेळी वाघाच्या शिकारीची तयारी ठेवावी लागते, असे गजेंद्रशेठ म्हणाले. कारण, कोणत्याही क्षणी रानात सशाऐवजी बिबट्या वाघ साक्षात उभा राहतो आणि मग धांदल उडण्याची शक्यता असते. त्यावेळी अलिबाग तालुक्यात वीज नव्हती अशा वेळी काळोखातील शिकार व जंगलातील भ्रमंती हाच मोठा थरार होता. भीतीदायकही वाटावा असा होता. परंतु, हौसेला मोल नाही. त्यामुळे अशा काळोख्या रात्री वीजेरीच्या उजेडात रानात शिकारीला जाणे हेच मोठे धैर्याचे व वेगळा आनंद देणारे होते. ते क्षण विसरणे कठीण आहे.

गजूशेठ दळी यांना कोणतेही काम आवडीने करावेसे वाटते. त्यामुळे सार्वजनिक वा सांस्कृतिक कामात त्यांचा मोठा वाटा असतो. आता तर पंच्याऐंशी पालटलेले गजूशेठ तरुणाला लाजवतील असे सतत कार्यक्रमात गुंतलेले असतात आणि हेच त्यांच्या जीवनातील यशाचे गमक आहे. ते जगातील ४० देशांचा दौरा करुन आले आहेत. परवा उभयतांचा सत्कार ज्येष्ठ नागरिक संस्थेत झाला. तो क्षण फारच भावनिक होता व मनाला भिडणारा, आनंद देणारा होता. दोघांचेही वर्तन अत्यंत नम्रतेचे व प्रेमाचे होते. असे वाटते की, एका पुरुषाच्या प्रगतीत त्याच्या पत्नीचा मोठा वाटा असतो. याचा प्रत्यय येथे येतो. त्यांना शुभेच्छा!

९३२६००४७४३

# आईस्टाईनचा जादुई खजाना!

काही दिवसांपूर्वी लोकलमधून प्रवास करत असताना कॉलेजातील मुला-मुलींची एकमेकांशी टिंगळटवाळी सुरु होती. एकमेकांची थट्टामस्करी करण्यात ते रमून गेले होते. अचानक त्यांच्यातील काही मुलं सीरियस झाली व काही गहन विषयासंबंधी आपसात बोलू लागली. त्यांच्या संभाषणात जेव्हा आईस्टानईचा उल्लेख आला, तेव्हा माझे कान आपोआप टवकारले गेले. ही अल्लड मुलं या थोर शास्त्रज्ञांबद्दल काय मत मांडततात. याबाबत माझ्या मनात कुतूहल उत्पन्न झालं होतं. पण, इतरांसारखीच त्यांचीही गाडी E=MC2 या समीकरणावर येऊन आपोआप थांबली. या समीकरणामुळे अणुबॉम्बची निर्माण प्रक्रिया सोपी झाली, याच्यावर त्या साऱ्यांचे एकमत झाले.



आईस्टाईनच्या या सोप्या वाटणाऱ्या समीकरणात अनेक जटील, तसेच जादूई प्रक्रिया दडलेल्या आहेत. प्रचंड मोठ्या प्रमाणात अणुऊर्जा कशी निर्माण होते, हे जसे समीकरण सांगते तसेच प्रत्येक वेळी आपण आपल्या मोबाइलचा उपयोग करतो. तेव्हा त्याचे वजन कमी होते. हेही आईस्टाईनच्या या समीकरणातून स्पष्ट होते. पण, याच्या उलट जेव्हा आपण पाणी तापवतो किंवा बॅटीने बॉल मारतो, तेव्हा त्यांचे वजन वाढते. त्याचबरोबर एखादी हालचाल करताना दुसरा जेव्हा कोणी तुम्हाला पाहात असतो, तेव्हा त्याला तुमचे वस्तुमान (मास) वाढलेले दिसते. तुम्ही स्थिर, अचल असाल तर तुमचे वस्तुमान हालचाल करताना वेळेच्या तुलनेत कमी असते.

वेध
प्रवीण गवळी

हे सारे थोडे विचित्रच वाटते आहे नाही? जेव्हा आईस्टाईनने १९०५ साली तीन सापेक्षतावादांचा सिद्धांत मांडला होता, तेव्हा त्याकाळचे शास्त्रज्ञ व जाणकारसुद्धा चक्रावून गेले होते. या सिद्धांताद्वारे जे काही निष्कर्ष निघत होते, ते कल्पनेपेक्षाही भन्नाट होते. ज्या गोष्टी सायन्स फिक्शनमध्ये संयुक्तिक वाटत होत्या, त्याच गोष्टी वास्तव स्वरुपात शक्य आहेत, हे या सिद्धांताद्वारे निष्पन्न होत होते. त्याची सत्यता, पडताळणी, पुरावा, उपयुक्तता, मांडणी करण्यात १०५ वर्षांपेक्षाही जास्त काळ लोटला आहे. हा सिद्धांत कसा चुकीचा आहे याच्यावरही अनेक शास्त्रज्ञांनी आपले श्रम व विद्वत्ता खर्ची घातलेली आहे. पण, या सिद्धांताच्या मदतीने आपण ऊर्जा निर्माण करू शकतो, वैश्विक ठिकाण निश्चिती प्रणाली (जीपीएस) विकसित करु शकलो व अवकाशभ्रमणही करुन येऊ शकलो.

सामान्य माणसाठी वस्तुमान व ऊर्जा या दोन वेगवेगळ्या गोष्टी आहेत. पण, आईस्टाईनला या दोन्हींत कोणतीही भिन्नता दिसली नाही. त्याच्या दृष्टीने ती एकाच गोष्टीची दोन रुपं आहेत. एखाद्या पदार्थाचे एकूण वस्तुमान त्याच्या स्थिर असण्यावेळचे वस्तुमान व त्यात एकवटलेली ऊर्जा असते. जर ऊर्जेत कोणत्याही प्रकारे बदल घडून येतो, त्यामुळेच जेव्हा आपण एखाद्या पदार्थाला गरम करतो. वस्तुला पळवतो किंवा बॅटरी चार्ज करतो, तेव्हा त्यांचे वजन वाढते. याउलट, जेव्हा गरम असलेला पदार्थ गार होतो, बल्बमधून प्रकाश बाहेर फेकला जातो, तेव्हा त्यांचे वजन कमी होते. ज्यावेळी ऊर्जेचा ऱ्हास होतो, त्यावेळी वस्तुमानात घट होते. ऊर्जा मिळाल्यानंतर वस्तुमानात वाढ होते. या साऱ्या प्रक्रियेदरम्यान आईस्टाईनचे E=MC2 हे समीकरण तंतोतंत लागू पडते. पण, पाणी तापवणे, बॅटरी चार्ज करणे किंवा रासायनिक क्रियादरम्यान उत्पन्न किंवा ऱ्हास होणारी ऊर्जा इतकी सूक्ष्मरित्या कमी असते, की वस्तुमानात पडणारा फरक अगदीच नगण्य असतो. हा फरक सहजासहजी मोजतासुद्धा येऊ शकत नाही. म्हणूनच, या सत्याकडे दुर्लक्षित केले जाते. उदाहरणार्थ कार्बन आणि हायड्रोजनच्या संयोगातून मिथेल तयार होते, तेव्हा ऊर्जेचा ऱ्हास होतो. कार्बन व हायड्रोजनच्या संयुक्तिक वस्तुमानापेक्षा मिथेल हे ०.०००३१ टक्के कमी वस्तुमान असते.

इथे आपण वस्तुमान व भार यातील फरक स्पष्ट करुन घेऊया. भौतिकशास्त्रज्ञ नेहमी वस्तुमानाबद्दल बोलतात. ते भाराबद्दल फारसं कधी बोलत नाहीत. पण, भार व वस्तुमान एखादा पदार्थ किती जड वा वजनदार आहे, याचे मोजमाप करतात. पण, वस्तुमानाचे मोजमाप त्यांच्यात असणाऱ्या अणुरेणु व ऊर्जेच्या शक्तीसह करण्यात येते. गुरुत्वाकर्षणाचा प्रभाव या वस्तुमानावर कोणत्या प्रमाणात होतो, त्याचे मोजमाप भार करते. त्यामुळे गुरुत्वाकर्षण बदलले तरी एखाद्या वस्तुमानात कोणत्याच प्रकारचा बदल होत नाही. त्यातील अणुरेणुंची संख्या तसेच अस्तित्वात असणारी ऊर्जा तेवढीच राहते. पण, त्यांचा भार बदलतो, पृथ्वीवर ज्याचे वजन १०० किलो असते, त्याचे चंद्रावर वजन फक्त ४० किलो भरते.

कार्बन व हायड्रोजनच्या संयुक्त वस्तुमानापेक्षा मिथेलचे वस्तुमान इतके सूक्ष्मरित्या कमी असते, की त्याकडे सारेचजण दुर्लक्ष करतात. आईस्टाईनच्या सिद्धांतानंतरच शास्त्रज्ञांचे या विषयाकडे लक्ष गेले, पण त्यानंतरसुद्धा हा प्रकार तितकासा सिरियसली घेतला जात नाही. कारण, रासायनिक प्रक्रियांमध्ये जी ऊर्जा कमी होते. किंवा वाढते, ती लौकिकार्थाने कोणत्याही रुपात प्रभावशाली नसते. शास्त्रज्ञांची ही प्रक्रिया प्रकाशाचा प्रचंड मोठ्या वेगामुळे जन्माला आलेली आहे. प्रकाशाचा वेग ३००,०००,००० मीटर प्रतिसेकंद आहे. जर आपल्याला एखाद्या पदार्थातून किती प्रमाणात ऊर्जा गेलेली किंवा आलेली आहे हे माहिती असेल, तर वस्तुमानात किती प्रमाणात फरक पडलेला आहे त्याचे मोजमाप आईस्टाइनच्या E=mc2 या समीकरणातून करता येते. समजा, सचिन तेंडुलकरने आपल्या बॅटच्या तडाख्याने बॉल सीमापार घालवला आहे. त्याने पूर्ण ताकदीनिशी फटकावल्यामुळे त्या बॉलची वेगाची शक्ती ३५ OmCb झाली आहे. OmCb हे शक्तीचे एकक आहे. या एककाची निर्मिती व्यावहारिक विद्युत एकक पद्धतीद्वारे झालेली आहे. एक व्होल्ट विद्युत वर्चस्वाखाली एक ॲम्पेअर विद्युतप्रवाह एक सेकंदभर गेला असता जेवढी शक्ती वापरली जाते, तेवढ्या शक्तीला एक OmCb म्हणातत. आईस्टाईनच्या समीकरणातील तीन घटकांपैकी दोन घटकांचे ज्ञान आता आपल्याजवळ आहे. ऊर्जा आणि प्रकाशाचा वेग या दोन घटकांच्या मदतीने आपण बॉलच्या वस्तुमानात होणारी वाढ निश्चितपणाने काढू शकतो.

E=mxc२

३५=mx३००,०००,०००

३५=mx९०,०००,०००,०००,०००,०००

M=३५/९०,०००,०००,०००,०००,०००

M=०.०००००००००००००००४ kg

म्हणजेच जेव्हा हा बॉल सचिनच्या बॅटच्या तडाख्याने सीमापार जात असतो, तेव्हा त्याचे वजन एका किलोच्या चार दशलक्ष अब्ज दशांशाने जास्त असते. पूर्णपणे चार्ज झालेली फोनची बॅटरी १०,००० OmCb ऊर्जेची ध्वनी असते. पण, ही बॅटरी जेव्हा पूर्णपणे डाऊन होते, तेव्हा तिच्या एक किलोच्या दहा हजार अब्ज दशांशाने वजन कमी होते. त्या बॅटरीचे वस्तुमान रेडिओ व ध्वनी तरंगाच्या रुपात आसमंतात विरहत असतात. या बॅटरीला परत एखाद्या चार्ज केल्यानंतर तिचे वस्तुमान पुन्हा वाढते.

पण, असे हे अतिसूक्ष्म बदल उपकरणांच्या सहाय्याविना लक्षात येणे महाकठीण असते. म्हणूनच रसायनशास्त्रज्ञ आईस्टाईनच्या या समीकरणाला जास्त महत्त्व देत नाहीत. भौतिकशास्त्रज्ञ खासकरुन अणुशास्त्रज्ञ या समीकरणाच्या मदतीनेच ऊर्जा उत्पन्न करण्याच्या कार्यात गुंतलेले असतात. न्युक्लिअर रिॲक्टरमधून किती प्रमाणात वस्तुमानांचा कचरा बाहेर पडतो, त्याचे मोजमाप ते करु शकतात. पण, सूर्यावर व सूर्यासारख्या इतर अगणित तारकांमध्ये जे अणुगर्भीय संघटन (न्युक्लिअर फ्युजन) घडून येते. त्यामुळेच त्यांच्यातून प्रकाश व ऊर्जा बाहेर फेकली जाते. जेव्हा चार हायड्रोजन अणुगर्भ संघटित होऊन एक हेलियम अणुगर्भ होते, तेव्हा त्यांच्यातील ०.७ टक्के वस्तुमान ऊर्जा परिवर्तीत होते. सूर्यावर तर ही प्रक्रिया प्रचंड मोठ्या प्रमाणात व अव्याहतपणे सुरु असते. सूर्यावर ६२० दशलक्ष टन हायड्रोजनचे संघटन प्रत्येक सेंकदाला होत असते. त्याचाच अर्थ असा, की प्रतिसेंकदाला सूर्य ४.२ दशलक्ष टन हलका होत असतो. त्याचे वस्तुमान कमी होत जाते. सगळ्यात मोठा लुझर तर सूर्यच आहे.

# गीता तुमच्या माझ्यासाठी

पुन्हा पुन्हा जन्म घेणे हे दुःखदायक आहे; हा विषय मागच्या लेखात चालला होता. पुनर्जन्म जसा दुःखदायक आहे, तसाच तो अशाश्वत ही आहे. ज्ञानेश्वर महाराजांनी जीवनाच्या क्षणभंगुरतेबद्दल म्हटले आहे,

**'हे काळानळाच्या तोंडी। घातली लोणियाची उंडी।**
**माशी पांख पाखडी। तव हे सरे।।'**




माशीला पंख हलवायला जेवढा वेळ लागतो, तेवढ्या अवधीत सारे संपून जाऊ शकते. माशी एका सेकंदात शंभरवेळा पंख हालवते, असे म्हणतात. म्हणजे, जीवन किती क्षणभंगुर आहे हे दिसून येते. कोणताही जन्म मिळाला तरी ते नवीन मिळणारे शरीर, काही कायम टिकत नाही. काळरूप अग्नीच्या तोंडात लोण्याचा गोळा घातलेला आहे, त्याचा नाश व्हायला असा कितीसा वेळ लागणार आहे?

भगवंत सांगतात की, ब्रह्म लोकापर्यंतचे सर्व लोक हे 'पुनरावर्तिनः' आहेत, म्हणजे स्वर्गादी सर्व लोकांमध्ये पुनः पुन्हा ये-जा करावी लागते. केवळ मृत्युलोक किंवा मनुष्यलोकच वारंवार जन्माला यायला लावतो असे नव्हे. पुण्याचा साठा संपला की, स्वर्गादी लोकांतून हकालपट्टी होते. हे म्हणजे भाड्याच्या घरात राहण्यासारखेच आहे. मालकाची मर्जी फिरली की घर सोडून जावे लागते. वारंवार घर बदलायचे म्हणजे काय सोपी गोष्ट आहे? बदलीची नोकरी असणारे यातील त्रास, दुःख नेमके जाणतात. नवीन घरात सामान लावायचे, गावात नव्याने ओळखी करून घ्यायच्या, व्यावसायिक, भावनिक संबंध निर्माण करायचे आणि जरा कुठे स्थिरस्थावर होत नाही, तोच पुन्हा बिऱ्हाड उचलून चालायला लागायचे. पुन्हा नव्या घराच्या शोधात!

मानवी जन्म म्हणजे, यापेक्षा दुसरे काय आहे? बालपणी विद्याभ्यास करायचा, तरुणपणी नोकरी, लग्न, मुलाबाळांचे संगोपन, पुढे मुलाबाळांची लग्ने, त्यांचे संसार मार्गी लावायची काळजी करायची! एवढे होईस्तोवर आपली नोकरी धंद्यातील जबाबदारी संपत आलेली असतेच. या सर्व जबाबदाऱ्या पार पाडल्यावर, 'हुश्श' म्हणून निवांत व्हायचे. आता आवडीचे छंद जोपासावे किंवा हरी हरी म्हणत भगवंत चिंतनात रमून जावे, असे मनसुबे रचत असतानाच, वार्धक्याचे पडघम केव्हा वाजायला लागतात, हे आपल्या कळतसुद्धा नाही! आणि हाहा म्हणता निघायची वेळ येते. त्यानंतर पुन्हा पहिल्यापासून नवा डाव! अशी वारंवार अनेक घरे फिरण्यापेक्षा एकच स्वतःचे हक्काचे घर घेतले तर? आणि हे घर म्हणजे अर्थातच भगवंताचे परमधाम आहे. आपले खरे घर ते आहे. भगवंत म्हणतात, मला प्राप्त होतात त्यांना पुनर्जन्म नाही.

इथे एक गोष्ट सांगणे आवश्यक वाटते. रामदासस्वामी, साईबाबा, स्वामी समर्थ, गजानन महाराज, गोंदवलेकर महाराज हे सारे थोर महात्मे! पण, तेसुद्धा जन्माला का आले? यांचाही जन्म दुःखालय व पुनरावर्तिनी म्हणजे पुनः पुन्हा होणारा आहे काय? असे प्रश्न मनात निर्माण होतात. पण, आपला जन्म व या महात्म्यांचा जन्म यामध्ये मूलभूत फरक आहे. आपण कर्माच्या बंधनामुळे जन्माला येतो. आपली इच्छा असो नसो, पण जन्म हा घ्यावाच लागतो. पण हे थोर संतजन स्वतःच्या इच्छेने जन्म घेतात. तोसुद्धा स्वतःच्या सुखासाठी नाही, तर लोकांचा उद्धार करण्यासाठी! हे महात्मे भगवंताच्या कार्यासाठीच भूतलावर अवतार घेतात. कारण, प्रत्येक जिवाचा उद्धार व्हावा अशी भगवंताचीच इच्छा असते, म्हणून भगवंत सामान्यजनांच्या उद्धारासाठी या संतांची योजना करतात. ज्ञानेश्वर महाराजांनी सांगितले आहे, 'मागिलिया जन्मा मुक्त झालो' पण ते पुन्हा जन्माला आले, ते भागवत धर्माची पताका रोवण्यासाठी, आपल्याला ज्ञानेश्वरी सांगण्यासाठी आणि हरिपाठ देण्यासाठी! केवढे मोठे कार्य आहे! आजही समाज त्यांनी दाखविलेल्या पाऊलखुणांवरुन भक्तीच्या वाटेने चालत आहे आणि भविष्यातही चालत राहील.



बोध भाग-६९
अनुराधा न. म्हात्रे-रानवडे

अलीकडच्या काळात श्रीस्वामी स्वरूपानंद (पावस) यांनी म्हटले आहे,

**'पाठवि येथें ती आम्हांतें मातेची नवलाई**
**चाकर आम्ही दिधल्या कामीं न करूं कधिं**
**कुचराई।। १५९।।(अमृतधारा)**

म्हणजे स्वामींना सांगायचे आहे की, आम्ही येथे जगन्मातेच्या आज्ञेने, तिने दिलेले कार्य करण्यासाठीच आलो आहोत. गीतेतील दिव्य संदेश सर्वसामान्य लोकांना उलगडून दाखविण्यासाठी माऊलींनी ज्ञानेश्वरी लिहिली, पण भाषेचे स्वरूप सतत बदलत असते, त्यामुळे आजच्या पिढीला ज्ञानेश्वरी समजणे सुलभ व्हावे म्हणून श्रीस्वामींनी आजच्या भाषेत अभंग ज्ञानेश्वरी लिहिली. सर्व संतांचे कार्य हे लोकांच्या कल्याणासाठीच असते. यावरुन लक्षात येईलच की, संतांना पुरावर्तिनी म्हणता येणार नाही.

> आपला जन्म व या महात्म्यांचा जन्म यामध्ये मूलभूत फरक आहे. आपण कर्माच्या बंधनामुळे जन्माला येतो. आपली इच्छा असो नसो, पण जन्म हा घ्यावाच लागतो, पण हे थोर संत जन स्वतःच्या इच्छेने जन्म घेतात. तोसुद्धा स्वतःच्या सुखासाठी नाही, तर लोकांचा उद्धार करण्यासाठी!

पुनर्जन्माचे जे दुसरे वैशिष्ट्य आहे, ते म्हणजे दुःखालय. मग संतांचा जन्म हा दुःखाचे आगर अथवा दुःखाचे गाठोडे असते काय? तर असे मुळीच नसते. वरवर पाहता त्यांच्या जीवनात दुःख दिसतीलही! मनुष्यदेह धारण केल्यानंतर सुखदुःख येणारच, पण ती यांच्यापर्यंत पोहोचत नाहीत; कारण संत जीवनमुक्त असतात. ते सतत आत्मानंदात असतात. 'सेवितो ब्रह्मरस आणि वाटीतो आणिका' अशी त्यांची स्थिती असते. ते अखंड ब्रह्म रसाचे सेवन करत असतात, इतकेच नाही तर इतरांनाही ब्रह्म रस वाटत असतात. ब्रह्मानंदाचा भंडारा उधळण्यासाठीच ते भूतलावर आलेले असतात. 'आनंदे भरीन तिन्ही लोक' अशी त्यांची वचनोक्ती असते; पण सर्वसामान्य लोकांसाठी मात्र पुनः पुन्हा जन्म घेणे हे दुःखदायकच असते.

जन्ममरणाचे चक्र पृथ्वीवरील याच्ययावत् सर्व जिवांना आहे. पृथ्वीलाही आहे आणि पृथ्वीचा कर्ता जो ब्रह्मदेव त्यालासुद्धा आहे. कालचक्राचे स्वरूप सांगताना भगवंत म्हणतात, ब्रह्मदेवाचा एक दिवस एक हजार चतुर्युगांचा आहे. रात्र ही एक हजार चतुर्युगांची असते. सत्ययुग, त्रेतायुग, द्वापार युग आणि कलियुग अशी चार युगे आहेत. कलियुगाचा कालावधी सर्वात कमी म्हणजे चार लाख बत्तीस हजार वर्षांचा आहे. कलियुगाच्या दुप्पट कालावधी द्वापार युगाचा आहे आणि असे हे द्वापार युग अधिक कलियुग मिळून त्रेतायुग होते. हे असे वाढत गेलेले त्रेतायुग व त्यामध्ये कलियुगाची वर्षे मिळवली की सत्ययुग होते. काळाची व्याप्ती किती प्रचंड आहे, हे यावरून लक्षात येते. हिशोब करून छाती दडपून जाते. ब्रह्मदेवाच्या दिवसाचा आरंभ झाला, की सृष्टीचा जन्म होतो आणि ब्रह्मदेवाची रात्र सुरू झाली की सृष्टीचा लय होतो म्हणजे उत्पत्ती आणि लय हे केवढे मोठे व दीर्घकाळ चालणारे कार्य आहे बघा!

९८२२८२२२३६

# अलविदा २०१९..!




आज २०१९ डिसेंबरची २९ तारीख उद्या आणि परवा असे डिसेंबरचे दोन दिवस राहिले आणि वर्ष २०१९ चेही. एक वर्ष संपतं आणि दुसरं सुरू होतं. अशी २०१९ वर्ष कालगणनेला झाली. प्रत्येक दिवसाला एक नाव असावं, कारण सातत्याने घटना केव्हा, कधी घडल्या याचं उत्तर मिळावं ही कालगणनेमागची खरी कल्पना. त्याबरोबरच घडणाऱ्या घटनांची सुसंगत इतिहास नोंद व्हावी हाही हेतू कालगणनाकारांचा असावा. मानवाची अरण्यावस्था संपून त्याने सुधारीत मानव जातीत प्रवेश केला, तो कौटुंबिक समूहवस्तीत वास्तव्य करू लागला, प्रगतीची वाटचाल त्याने सुरू केली तेव्हा सकाळ होते, तेव्हा दिवस सुरू होतो आणि रात्री तो संपतो. पुन्हा सकाळ पुन्हा रात्र, या नित्य नियमित नैसर्गिक चक्राचा काही अर्थ लावण्याचा प्रयत्न त्याने केला असावा.

काही नैसर्गिक घटना घडून गेल्या, त्या घडून गेल्यावर काही दिवसांनी त्या विस्मृतीत गेल्या. कुटुंब संस्था अस्तित्वात आल्यावर कुटुंबात एखादं बाळ जन्माला आलं, ते दिसामाशी वाढू लागलं, मोठं झालं, एक दिवस ते मृत्यू पावलं, ते केव्हा जन्माला आलं, किती वर्षे जगलं आणि कधी मृत्यू पावलं या व अशा अनेक घटना केव्हा घडल्या, असा प्रश्न जेव्हा माणसाला पडू लागला, तेव्हा या घटनांची नोंद असण्याची गरज त्याला भासू लागली. परिणामी, कालगणनेची सुरुवात झाली असावी, असं मला वाटतं. ही कालगणना ख्रिस्त पूर्व काळातच सुरुवात झाली, आज आपण जेव्हा २०१९ साल संपलं असं म्हणतो तेव्हा ख्रिस्ती कालगणनेची २०१९ वर्षे संपली असा त्याचा अर्थ असतो. या कालावधीत विशेष लक्षात राहातो तो १८५७ पासूनचा कालावधी. कारण, त्या कालावधीतील इतिहास आपल्यासारख्या सामान्य माणसांना ज्ञात आहे. कारण तो आपण वाचला आहे, इतिहासाचे विद्यार्थी म्हणून थोडाफार अभ्यासला आहे. यामध्ये तात्या टोपे, झाशीच्या राणीचा १८५७चा संग्राम, शिवाजी महाराजांचा १६३० ते १६८०चा



शब्दगंधा
शशिकांत मुद्देबिहाळकर

काळ, पेशवाई, पानिपतचे युद्ध, नंतरचा ब्रिटिशांनी दीडशे वर्षे भारतावर केलेले राज्य, स्वातंत्र्याची चळवळ, १५ ऑगस्ट या दिवशी रात्री मिळालेले स्वातंत्र्य, २६ जानेवारी रोजी प्रजासत्ताक झालेला भारत, पं. जवाहरलाल नेहरू हे झालेले भारताचे पहिले पंतप्रधान, तसेच त्यानंतर आजपर्यंत झालेल्या राजकीय घडामोडी या सर्वांचा इतिहास समजण्यासाठी, अभ्यासण्यासाठी कालगणनेशिवाय पर्याय उरत नाही. कालगणना म्हणजे केवळ दिवसांचे मोजमाप नव्हे, तर वर्षानुवर्षे घडणाऱ्या घटनांचा सुसंगत इतिहास असतो. कालगणनेची कॅलेंडरमधील पाने महिना संपला की आपण सहजपणे उलटतो.

महिन्यात घडलेल्या घटनांना मागे टाकतो. पण, त्या मागे पडत नसतात, तर महिन्यातील प्रत्येक दिवस आपली एक आठवण ठेऊन जात असतात. आपला ठसा उमटवत असतात. पण, या आठवणी किंवा घडलेल्या भूतकाळातील घटनांची, नोंद ठेवायची तर कालगणनेचाच भाग असतात. कालगणनेचा पर्याय सापडला नसता तर आपल्याला भूतकाळातील गोष्टी किंवा इतिहास कसा समजला असता? कधी-कधी प्रश्न पडतो रामायण, रामाचे वनवास, महाभारत, कौरव पांडव यांचे हसतीनापुरातील युद्ध, श्रीकृष्णाने अर्जुनाला सांगितलेली गीता अशा अनेकाविध घटना घडलेल्या तर आहेत. त्यांच्या अस्तित्वाच्या खुणा काही वास्तूंमधून सापडतात. नुकत्याच राम जन्म भूमीच्या वादग्रस्त जागेबाबत संशोधनाअंती काही गोष्टी समोर आल्या त्यावरून तेथे कोणी एके काळी राम मंदिराच्या वास्तू होत्या, हे सपष्ट झाले. पण प्रश्न पडतो, की मग हा काळ ख्रिस्तपूर्वीचा असावा. याचा अर्थ पुराणकालीन कालगणना पद्धती अस्तित्वात होती का? असेल तर ती कोणती होती? जगातील अनेक महत्त्वाच्या घटनांचा अचूक कालावधी मिळत नाही. कारण, कालगणना पद्धत अनुसरण्याकडे आपल्या पूर्वजांना अवसर मिळाला नसावा. चंद्रगुप्त मौर्य, चाणक्य यांचा काळ नक्की कोणता होता. कालगणनेचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. आज तारीख कोणती, हा प्रश्न आजसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. कारण, आपलं जगणंच या तारखेवर विसंबून आहे.

तारीख हा माणसाच्या आयुष्याचा भाग झालाय. तारखेच्या तालावर आपण नाचतो आहोत. २०१९ ला निसप देताना या वर्षभरात आपल्या खासगी आयुष्यात, काय घडलंय, आपल्या व्यावसायिक आयुष्यात आपली काय अवस्था आहे, राजकीय आयुष्यात काय चाललंय, आई-वडिलांच्या, बायकोच्या, बहिणीच्या मित्र, मैत्रिणींविषयी आपली काही कर्तव्ये राहून गेली का? आपल्यापासू कुणाला त्रास तर झाला नाही ना? आपली रोजनिशी या सर्वांची साक्षीदार आहे. तिच्यात थोडं डोकाऊ या, आढावा घ्यायलाच हवा एकदा, पुढील वर्षात कमीत कमी चुका होण्यासाठी. कुणाला अजाणतेपणे दुखवलं असेल तर त्या व्यक्तीची समजूत काढायला हवी. २०२०चा धडाक्यात प्रवेश होईल स्वागत करण्यासाठी आपण मागे राहून कसे चालेल? नवीन वर्षाची संधी आलीय, काही चांगल्या गोष्टी करण्यासाठी. नवीन वर्ष २०२०च्या 'शब्दगंधा'च्या सर्व वाचकांना शुभेच्छा आवर्जून वाचून अभिप्राय देणाऱ्या सर्व रसिकांना खूपखूप शुभेच्छा आणि आभार.

९७६७१५२६०८

# ज्ञानदेवकृत संगती



षष्ठाध्याय मागील अध्यायातील स्पर्शान्कृत्वा (५.२७) या श्लोकात ध्यानाचा अस्पष्ट पण सूत्ररुपाने उल्लेख आहे. त्याचा विस्तार या अध्यायात आहे, असे आचार्यांना वाटते. तर ज्ञानेश्वर म्हणतात त्याप्रमाणे षष्ठाध्याय म्हणजे योगविभवभांडार (ज्ञा. ६-११) आहे. परंतु पूर्वीच्या अध्यायाचा उल्लेख न करता प्रपंच निभावून ही योगसाधना करता येते. तिचे विस्तृत निरुपण आहे. आचार्य म्हणतात, ते अधिक सुसंगत आहे.

सातव्या अध्यायाचा संबंध जुळवताना आचार्य म्हणतात, सहाव्याच्या श्लोकात (मद्गतेन ६-४७) पुढील अध्यायाचे बीज आहे, तर वंशपरंपरेने प्राप्त करीत योग ही साधता येतो, त्यासाठी वेगळे साधन करावे लागत नाही, हे सांगण्यासाठी हा आध्याय आहे, असे ज्ञानदेवाचे मत आहे.

सातवा आणि आठवा या अध्यायाचे नाते स्वतः गीताकारच सांगताहेत. सातव्याच्या शेवटी अनेक संज्ञांचा अर्थ अर्जुनाने विचारला. उत्तर या अध्यायात भगवंतांनी दिले आहे, असे दोघांनाही मान्य आहे.

नववा, तेरावा, पंधरावा आणि अठरावा हे अध्याय विषयाच्या दृष्टीने महत्त्वाचे असे समस्त भाष्यकार-टीकाकार म्हणतात. परंतु, त्यांच्या पूर्वीच्या अध्यायांशी संबंध सांगताना वेगळी मते देतात. यात मूळ गीतकारांना काय अभिप्रेत आहे, हे मात्र स्पष्ट होत नाही.

आचार्य मात्र वेदवचनांचा आधार घेऊन 'ते आत्मज्ञान तेही अनुभवासह तुला सांगतो' अशी प्रस्तावना करुन त्याचे स्वरुप श्रीहरी या अध्यायात सांगताहेत, असा संबंध जुळवतात. पूर्वी (गी. ७-१२) हे सर्व काही वासुदेव, असा त्रोटक उल्लेख आला आहे. त्याचा विस्तार करण्यासाठी हा अध्याय आहे, असे त्यांचे मत आहे. ज्ञानदेव नवव्याला सर्वाधिक महत्त्व देतात, तथापि पूर्वापार संबंध मात्र सांगत नाहीत, हे नवलच.

तेराव्याचे तेच बाराव्यात. भक्तियोग सांगितला तो दहाव्यातील विभूति प्रत्यक्ष पाहण्याची इच्छा अर्जुनाने व्यक्त केल्यामुळे ११व्यात विश्वरुप दाखवले, यावर त्याचे चित्त केंद्रित करावे या प्रभूच्या म्हणण्यावरुन अर्जुनाला विश्वरुप की सावळे कृष्णरुप श्रेष्ठ ही शंका निरसावी म्हणून बाराव्यात साकाररुपाच्या भक्तीचे निरुपण करण्यात आले, अशी सर्वांची संगती ज्ञानदेव लावतात. आचार्यही जवळ-जवळ या मतांशी सहमत आहेत. परंतु, तेराव्याची संगती मात्र ज्ञानदेव देत नाहीत. आचार्य सप्तमाध्यातील परा आणि अपरा या दोन (७-४.५) प्रकृतीचा उल्लेख अस्पष्ट असल्याने, त्यांचेच विस्तृत विवरण आहे, असे त्यांचे मत आहे.

पुढे चौदाव्यात प्रकृतीच्या तीन गुणांचे स्वरुप वर्णिले आहे, हे दोघेही मान्य करतात.

परंतु १५व्याची संगती लावताना, हे त्रिगुणात्मक विश्व मिथ्या नश्वर ब्रह्म शाश्वत परम सत्य, नश्वर जगाने अश्वत्थ रुपाने वर्णन करुन त्याविषयी विरक्ती यावी, या हेतूने १५व्याचे नियोजन असल्याचे दोघांनी मान्य केले आहे. ज्ञानदेव म्हणतात, अन्नात विष मिसळल्याचे कळताच भोक्ता ते अन्न टाकून देतो. तसेच हा संसार अनित्य-नश्वर आहे, हे कळले तर मानवाला विरक्ती येईल, मग तो मोक्षमार्गी लागेल म्हणून नाशवंत जगाचे

वेध
डॉ. सिद्धेश्वर महाराज

स्वरुप अश्वत्थरुपाने विवरले आहे, असे मानून दोघेही अध्याय पूर्वाध्यांशी सुसंगत



असल्याचे सांगतात.

सोळावा अध्याय दैवी आसुरी संपदेच्या वर्णनासाठी आहे. पूर्वी सातव्या अध्यायात त्यांचे संक्षिप्त वर्णन आले असून, त्यांचे विस्तृत विवेचन यात आहे, असे दोघांनाही वाटते. आसुरी संपदा (अर्थात, राक्षसी वृत्ती) ही त्याज्य, तर दैवी संपदा (सद्गुण) ही स्वीकारर्ह आहे, असे मत दोघांनीही नोंदले आहे.

मात्र, १८व्याचे भवितव्य अधांतरीत आहे, असे वाटते. तथापि, आचार्य आणि ज्ञानदेव या दोघींचेही इथे ऐकमत्य आढळते. मागील सतरा अध्यायातील विषयांचा संक्षिप्त उल्लेख त्यावर थोडेसे विवरण करुन अर्जुनाला स्वकर्तव्याची जाणीव करुन देण्यासाठी हा अध्याय अवतरला आहे, असे दोघेही म्हणतात. 'साळीचा कणु म्हणे। मी नुगवे साळीपणे (ज्ञा.१८-१२८७) हा समर्पक दृष्टांत देऊन साळीचे बी, साळीचे रोप म्हणून उगवणार तसे अर्जून क्षत्रिय म्हणून वागणार, असे ठाम मत ज्ञानदेव देतात. एवं हा अध्याय पूर्वीच्या अध्यायाशी सुसंगत आहे, हे पटवून देण्यात यशस्वी ठरले आहेत. थोड्याफार अंतराने आचार्यही हेच म्हणतात.

एकूण, ज्ञानदेवांनी गीताध्यायांची सुसंगती दाखवून देण्याचा प्रयत्न केला आहे. तो उचितच म्हणावा लागेल. प्रस्तावनेत म्हटले त्याप्रमाणे श्रीगीतेची खरे तर पाचवी व्यासांनी लिहिलेली आवृत्ती होय. इतक्या संवादातून तिचे मूळ रुप बदलत गेले असणे शक्य आहे.

एका विद्वान अभ्यासकाने एका ग्रंथाचे प्रणयन करुन गीतेचे स्वरुप स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. (गीता ज्ञान प्रवेशिका गीता प्रेस) परंतु तो हिंदी भाषिक असल्याने मराठी ज्ञानेश्वरीचा उल्लेख करु शकला नाही.

लोकमान्य टिळकांनी 'गीतारहस्य' हा ग्रंथ लिहून गीता हा कर्म सांगणारा ग्रंथ असल्याचे मत मांडले आहे. त्यांनीही अध्यायांची संगती दाखून देण्याचा काहीसा प्रयत्न केला आहे. पं. श्रीधरामनी गीतेवर संस्कृत टीका लिहिली, तीत अध्यांयाचा परस्पर संबंध दाखून दिला. भूतपूर्व राष्ट्राध्यक्ष डॉ. स. राधाकृष्णन यांनी या ग्रंथावर इंग्रजी भाष्य लिहिले आहे. त्यांनी ही अशी संगती लावून अध्याय परस्परांशी सुसंगत असल्याचे मत दिले आहे. श्रीगीता ज्ञानाचे अगाध भांडार आहे. विद्वान अभ्यासक तिच्या आधारे आपले ज्ञान तपासून घेत असतात, अगदी ठिगळवादीही याला अपवाद नाहीत.

संदर्भ -
१. ज्ञानेश्वरी (शं.वा. दाडेकर, आळंदी)
२. गीता भाष्यार्थ प्रकाश (पं.जोग. शास्त्री, पुणे)
३. श्रीगीता इंग्रजीभाष्य (डॉ. राधाकृष्णन, मुंबई)
४. गीतारहस्य (लो. टिळक, पुणे)
५. ज्ञानेश्वरदर्शन (म.वा. देशमुख, नगर)
६. गीताज्ञान प्रवेशिका (गीताप्रेस गोरखपूर )
७. महाभारत- भीष्मपर्व (गीताप्रेस गोरखपूर)

उत्तरार्ध

# पैशाचे मूल्य आणि खरी कमाई

त्या दिवशी सकाळच्या रम्य प्रहरी, थोड्याशा गुलाबी थंडीच्या सहवासात समुद्रावर फिरायला जाताना ओळखीची मुलगी भेटली. ती नुकतीच नर्सिंगची परीक्षा पास झाल्याचे आणि त्यामुळे सध्या आईकडे आल्याचे तिच्याकडून समजले. मी तिचे अभिनंदन आणि कौतुक केले, कारण तिच्या आईने वैधव्याचे दुःख आणि परिस्थितीचे चटके सोसत मुलीला पुण्याला कसे शिक्षण दिले आहे याची त्या मुलीप्रमाणेच मलाही कल्पना होती. तिच्या बरोबरच्या तिच्या मैत्रिणीचीही सहज चौकशी केली. ती येथील एका महाविद्यालयात वाणिज्य विभागात शेवटच्या वर्षाला शिकत होती. तिच्या हुशारीमुळे मी तिला आणखीही काही साधेसेच, पण तिच्या अभ्यासाशी निगडीत प्रश्न विचारले.

'पैशाचे मूल्य म्हणजे काय?' तिला काहीच उत्तर देता येईना. अर्थशास्त्राचा ती यावर्षी अभ्यास करीत होती. त्याआधी तिने शालेय जीवनापासून सहा-सात वर्षे अर्थशास्त्र हा विषय शिकलाही होताच. परंतु, ती काहीच बोलेना. ओळखीच्या मुलीलाही मी तोच प्रश्न विचारला, तिने फक्त नकारात्मक खांदे उडवले. शिक्षण संपेपर्यंत काही विद्यार्थ्यांना परिस्थितीची आणि व्यवहारातली प्रत्यक्ष समस्यांची काहीच कल्पना नसते. मात्र, त्यांच्या पालकांना त्यांची नेमकी जाणीव आणि कल्पनाही असते. दैनंदिन व्यवहारात आपण सर्वच क्षेत्रांत, विज्ञान आणि अन्य शास्त्रांतील विविध संकल्पना साध्या भाषेत वापरत असतो. त्यांचा शास्त्रीय अर्थ किंवा व्याख्या कदाचित माहीत असेल किंवा नसेलही. त्या मुलींना पैशाचे मूल्य म्हणजे पैशाची खरेदीशक्ती ही साधी गोष्ट 'अर्थशास्त्र' विषय शिकूनही सांगता येत नव्हती. मध्यंतरी कांद्याचे भाव देशभर भराभरा वाढत गेले. त्यामुळे कांद्याचे वाढते दर अनेक ग्राहकांना किंवा वापर करणाऱ्यांना त्रासदायक, जाचक वाटू लागले. कारण, कांद्याच्या संदर्भात पैशाचे मूल्य घटत चालले.

किंमत पातळी आणि पैशाचे मूल्य यांचा नेहमीच परस्परविरुद्ध संबंध असतो. जेव्हा किंमती वेगाने वाढतात, तेव्हा पैशाची खरेदीशक्ती किंवा मूल्य वेगाने घटते. म्हणजेच, पूर्वी एवढ्या त्याच वस्तूंच्या खरेदीसाठी जास्त रुपयांची गरज असते. चलन पुरवठ्यात वाढ, वस्तूंचा वाढता तुटवडा आणि वाढती मागणी, भविष्यात आणखी किंमती वाढतील अशी सर्वसामान्यांना वाटणारी भीती किंवा शक्यता या विविध कारणांमुळे किंमती वाढत जातात. अशा स्थितीत गरीब, स्थिर उत्पन्नाचे लोक, शेतकरी, गृहिणी त्रासले जातात; पण व्यापारी, उत्पादक, कर्ज घेणारे हे खुश असतात. सध्या भारतात कुंठीत किंवा गतिशून्य अर्थव्यवस्थेची स्थिती आहे. मंदीयुक्त भावफुगवट्याच्या काळात वाढत्या किंमती आणि मंदी अशी स्थिती एकाचवेळी दिसते; बेकारी वाढते. अशा वेळी सरकारने वाढत्या किंमतींवर नियंत्रण ठेवत उत्पादनवाढीसाठी त्वरित अल्पकालीन आणि दीर्घकालीन उपाय योजण्याची नितांत गरज असते.



काही दिवसांपूर्वीची अशीच एक गोष्ट. सकाळी भटकंती संपवून घरी येताना एका वकील विद्यार्थी मित्राच्या घरी गेलो होतो. त्यांची मुलगी पाच वर्षीय कायद्याच्या अभ्यास क्रमातील पहिल्या वर्षाचा अभ्यास



विशेष लेख
प्रा. शाम जोगळेकर

करीत होती. त्यांच्याकडे जाताच तिने तिच्या अर्थशास्त्र विषयातील काही शंका आणि



अडचणी विचारल्या, त्यांची उत्तरे मिळताच ती खूष झाली. मी तिला अभ्यास करण्याविषयी काही सूचना दिल्या. काही प्रश्नही विचारले. रोज पेपर वाचते का? शब्दसंग्रह वापरते का? स्पर्धा परीक्षेसाठी उपयुक्त असणारी नियतकालिके कोणती वाचते? इत्यादी सर्व प्रश्नांची तिची उत्तरे नकारात्मक होती. तरुण पिढी आता कमी वाचते आणि याची गरजच नाही, असे त्यांचे ठाशीव उत्तर असते. कारण, स्मार्ट फोन मदतीला आहे; 'गुगल गुरु' सर्व काही क्षणात सांगतो. नंतर मी तिला पुन्हा एकदा भेटलो तेव्हा विचारले, की स्मार्ट फोनची किंमत किती? आणि 'गुगल' सुरु ठेवण्यासाठी दरमहा खर्च किती? दहा हजार आणि दरमहा तीनशे रुपये हे उत्तर तिने क्षणात दिले. विजेचा वाढता वापर, स्मार्टफोन विनाकारण चैनीसाठी किंवा सवयीने वापरण्याचा वाढता कल, त्यामुळे होणारे अल्पकालीन आणि दीर्घकालीन दुष्परिणाम यांची तिला जाणीवच नव्हती. पुस्तके, वृत्तपत्रे, नियतकालिके यांच्या वापराने होणारा खर्च, वाचणारा वेळ हे मी तिला सांगितले; पण, तिला हे जाणवलेच नाही. 'स्मार्ट फोन' तुझ्या पैशाने म्हणजे मिळविलेल्या पैशाने खरेदी केला का, असे विचारता तिने केवळ नकारात्मक उत्तर दिले. पिढीतील वाढते अंतर केवळ वयावर अवलंबून नाही; ते वैचारिकही आहे, याची माझ्या मनाने नोंद घेतली.

सुमारे साठ वर्षांपूर्वी शाळेत पाचव्या इयत्तेत शिकत असताना तेव्हाच्या तरुण सरांनी आम्हाला एकदा बालवीर संघटनेची (भारत स्काऊट आणि गाइड संघटना, स्थापना १९५०) माहिती दिली. सर्वांशी प्रेमाने वागावे, शिस्तबद्ध राहून सार्वजनिक मालमत्तेचे रक्षण करावे वगैरे सांगितले. एक समूहगीत 'लाल टांगा घेऊनी आला आला टांगेवाला...' तेव्हा शिकविल्याचे आठवते. पण, नंतर गणवेश वगैरे पुढे काहीच झाले नाही. पुढे अलिबागला नोकरीसाठी आल्यावर काही शाळकरी मुले 'खरी कमाई'साठी घरी येऊन काही काम मागू लागली. किरकोळ काम करुन ही ओळखीची मुले पाच-दहा रुपये घेऊन, कार्ड भरुन घेऊ लागली. ही 'खरी कमाई'ची जाणीव सध्याच्या तरुण पिढीमध्ये क्वचितच दिसते.

मात्र, शिक्षण संपल्यावर युवक-युवतींना नोकरी, व्यवसाय करण्याची गरज तीव्रतेने भासू लागते. पालकांवरील आपला भार कमी व्हावा धाकट्या भावंडांना (असल्यास) त्यांचे शिक्षण घेण्यास मदत करावी, असे वाटू लागते. त्यावेळी मग नोकरीचा पहिला पगार खूप मौल्यवान वाटू लागतो. ही भावना तीव्रतेने निर्माण होणे हीच संपन्नतेच्या मार्गावरील पहिली पायरी ठरते. जबाबदारीची ही जाणीव नोकरी, धंदा करुन कसेतरी शिक्षण घेणाऱ्या काही युवक-युवतींना खूप आधीच अंगावर पडते. परिणामी, त्यांचे शिक्षण थांबते किंवा त्यांना ते सोडावे लागते. हे होऊ नये ही आपणा सर्वांचीच जबाबदारी नाही का?

९२७३३४३१७७

# बुनियादी शिक्षण

**आचार्य विनोबा भावे एक दूरदर्शी तत्त्ववेत्ता, शिक्षण तज्ज्ञ, क्रांतिकारक संत, वैश्विक मूल्ये जपणारे, अध्यात्मिक आणि तितकेच विज्ञाननिष्ठ, विरक्त जीवन जगणारे, एक ऋषितुल्य माणूस. विनोबांच्या १२५व्या जयंती वर्षांच्या निमित्ताने त्यांचा जीवनपरिचय करुन देणारी ही लेखांची मालिका...**





विनोबा प्रणित शिक्षण हे अनेक अर्थांनी 'बुनियादी' आहे. बुनियाद म्हणजे पाया. शिक्षण हा जीवनाचा पाया आहे, आपल्या देशातील समाजकारणाचा, राजकारणाचा, अर्थकारणाचा, पाया आहे. व्यक्तिगत जीवनाचा तसेच आपल्या सार्वजनिक जीवनाचा पाया आहे. म्हणजेच, या सर्व गोष्टींची उभारणी कशी होईल, हे शिक्षणावर अवलंबून आहे. याचा दुसरा अर्थ असाही होतो, की बुनियादी शिक्षण हे पुढे जन्मभर चालणाऱ्या शिक्षण प्रक्रियेचादेखील पाया आहे. अर्थात, सर्वच अंगांनी शिक्षण ही गोष्ट अतिशय मूलभूत, महत्त्वाची किंबहुना समाजजीवनाच्याच केंद्रस्थानी आहे. विनोबा म्हणतात, बुनियाद म्हणजे पाया, तर पाया त्रिकोणी आणि इमारत चौकोनी असे होऊ शकत नाही. एवढ्या एका वाक्यावरून आपल्या लक्षात येते, की आपण आपल्या देशातील समाजाची, अर्थव्यवस्थेची, राजकारणाची, इमारत आपल्याला जशी बनवायची आहे त्यानुसार शिक्षणाची, म्हणजेच इमारतीच्या पायाची रचना करायला हवी. आपल्याला लोकशाही देश घडवायचा असेल, तर लोकशाही मूल्ये ही शिक्षणातून रुजायला हवीत. विविधतेने नटलेल्या आपल्या समाजाला एकसंध राखायचं असेल तर समता, बंधुता, न्याय आणि स्वातंत्र्य ही मूल्ये आपल्याला शिक्षणातून जपायला हवीत. आपल्या देशाची अर्थव्यवस्था आजही कृषीप्रधान आहे. भविष्याचा विचार करता ती कृषीप्रधानच राहील, हे नक्की. असे असताना आजच्या शिक्षणामध्ये कृषी संस्कृती जपणारे आणि वृद्धिंगत करणारेही शिक्षण असायला हवे.

भविष्याची कल्पना करताना, आज अस्तित्वात असणाऱ्या समस्या व त्यांच्या निराकरणाचा विचारही करायला हवा. आजची परिस्थिती पाहता, आपल्या लक्षात येईल, की आज मानवाचं आणि एकूणच सजीवांचं अस्तित्वच धोक्यात आलेले आहे. वाढतं प्रदूषण, असंतुलित पर्यावरण, ग्लोबल वॉर्मिंगमुळे निर्माण झालेली भयावह परिस्थिती आणि या सर्वांमुळे भविष्यातील मानवी जीवनाच्या पुढे उभे ठाकलेले मोठे प्रश्नचिन्ह... आज पृथ्वी आणि पर्यावरण यांचं जीवनच धोक्यात आलं असल्यामुळे आधुनिक तंत्रज्ञान, विज्ञान, ऊर्जा व विद्युतनिर्मितीचे महाकाय प्रकल्प, मोठी धरणे, मोठे उद्योगधंदे, अवजड कारखाने, खनिजांचे उत्खनन, पेट्रोलियमचा अखंड-अव्याहत-अमर्याद उपसा आणि या सर्वांच्या भोवती फिरणारे अर्थकारण, समाजकारण आणि राजकारण या सर्वच गोष्टींचा पुनर्विचार करण्याची वेळ आता आलेली आहे.

विशेष
नीला आपटे
लेख क्र. १४

या सर्वच गोष्टी पृथ्वीच्या पर्यावरणाच्या नाशाला आणि पर्यायाने मानवी जीवन संपुष्टात आणण्याला कारणीभूत आहेत, हे आता लक्षात आलेले आहे. असे असताना, या सर्व वाट चुकलेल्या, आभासी विकासाच्या इमारतींना भक्कम करणारं शिक्षण द्यायचं की मानवाच्या अस्तित्वाच्याच प्रश्नाला भिडून, विनाशाचा मार्ग थोपवण्याची प्रेरणा आणि तयारी करणाऱ्या शिक्षणाची बुनियाद तयार करायची हेच आता आपण प्राधान्याने ठरवायला हवंय.

विनोबांनी बुनियादी शिक्षणाचा विचार मांडला त्यावेळेस परिस्थिती खूपच वेगळी होती. स्वतंत्र भारताची उभारणी करण्याचं मोठ आव्हान तेव्हा देशासमोर होतं. ब्रिटिशांच्या गुलामगिरीतून मुक्त होऊन, एक अस्तित्वाची लढाई आपल्या देशाने जिंकली होती. आपल्याकडे जी काही साधनसंपत्ती उपलब्ध आहे, त्यातूनच विचारपूर्वक नियोजन करून देश उभारायचा होता. पण, आता पुन्हा नव्याने जागतिक स्तरावर जीवसृष्टीच्या अस्तित्वासाठी संघर्ष सुरु झालेला आहे. अजून पंचवीस वर्षांनंतर जग खूप वेगळे असणार आहे. पर्यावरण विनाश व प्रचंड वेगाने कमी होणारी नैसर्गिक साधनसंपत्ती यांचे गणित अनेक जागतिक संघटनांनी व वैज्ञानिकांनी मांडलेले आहे, त्यानुसार अजून वीस-पंचवीस वर्षांनंतर पाणी आणि पेट्रोल यांचे साठे जवळ-जवळ संपणार आहेत. जनजीवन आणि जीवसृष्टीवर याचा प्राणघातक परिणाम होणार आहे. भविष्यात येऊ घातलेल्या अशा जगाचीच कल्पना करून बुनियादी शिक्षणाची नव्याने मांडणी करण्याची गरज आज निर्माण झाली आहे. अर्थात, भविष्यात जग जसे बनेल याचा अंदाज केला जात आहे, तसे ते बनू नये यासाठी आपल्याला शिक्षणाचा पाया रचायचा आहे, विकासाचा मुखवटा घातलेल्या विनाशाची दिशा सोडून पर्यावरणस्नेही विकासाच्या मार्गाने जायचे आहे.

बुनियादी शिक्षणाचे दुसरे नावच नयी तालीम. 'नयी तालीम' या नावातच त्या शिक्षणाचं नित्य नवेपण, ताजेपण आहे. परिस्थितीनुसार, गरजेनुसार अभ्यासक्रम, अध्ययन-अध्यापन पद्धती यामध्ये बदल घडवू देणारे हे एक लवचिक शैक्षणिक तत्त्वज्ञान आहे. म्हणूनच, भविष्यातील जग कसे असावे याचा विचार करून आजच्या शिक्षणाची रचना हा बुनियादी शिक्षणाचा मंत्र स्मरून आजच्या बुनियादी शिक्षणाचा थोडा विचार करूया. कसे असेल हे शिक्षण?

आजचं आपलं जगणं पाणी, पेट्रोल आणि वीज या त्रयींनी व्यापून टाकलेले आहे. पाणी, पेट्रोलचं दुर्भिक्ष्य तरी जागतिक वास्तव बनलं आहे. भारतातील ६३ टक्के वीज ही खनिजे व खनिज तेलांपासून बनते व त्याचे साठेही किती वर्षे पुरतील याची शंकाच आहे. मग यापुढे शाळेत प्रवेश घेतलेली मुले २०-२५ वर्षांनी शिकून, काय घेऊन बाहेर पडतील, जेणे करून त्यांना या अभावाने व्यापलेल्या जगात सुखा-समाधानाने जगता येईल! आज ज्या व्यवसायांची चलती आहे. त्यापैकी बरेच व्यवसाय हे या त्रयींवर प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष अवलंबून आहेत. त्यामुळे केवळ हेच व्यवसाय जमतील, असं औपचारिक शिक्षण देऊन चालणार नाही. मग पुन्हा आपण जीवनकौशल्य, उद्योगाधारित शिक्षण, मूल्याधिष्ठित शिक्षण, जीवनाभिमुख शिक्षण अशा गोष्टींकडे येतो. कोणत्याही बाह्य आधारावर अवलंबून न राहता, कितीही प्रतिकूल परिस्थिती ओढवली तरी आपल्याला आयुष्यात ठामपणे स्थिरावता येईल, असे शिक्षणही आवश्यक वाटू लागते.

पुन्हा आपण इमारत आणि बुनियाद यासंदर्भाने विचार केला तर, आपल्याला इमारतीत विकास हवाय, पण बकाली विनाश नकोय; माणसाच्या जीवनाची समृद्धी हवी आहे, पण सृष्टीचा नाश नकोय; सर्वांच्या हाताला काम हवंय, पण शोषण नकोय; प्रत्येक कोपरा प्रकाशमान व्हायला हवाय, पण विजेसाठी पर्यावरणाचा लिलाव नकोय. थोडक्यात, आपल्याला पर्यायी जीवनासाठी पर्यायी विकास हवाय आणि अशी इमारत उभी करण्यासाठी पर्यायी शिक्षणाची बुनियाद; अर्थात, बुनियादी शिक्षण हवंय.

(अध्यक्ष, विनोबा आश्रम, गागोदे)
- ९४०५९२४२२७

## कविता

### क्षणभर विश्रांती

मुंबई-गोवा हायवेवरचे गजबजलेले गाव
रस्त्याच्या दुतर्फा वसले 'वडखळ' त्याचे नाव
परंपरागत शेती, मिठागरे, करती मासेमारी
छोट्या-छोट्या वस्त्या साऱ्या खाडीच्या किनारी
आगरी-कोळी बांधवांसवे राहती परप्रांतीय
विविध भाषा भगिनी नांदती सारे भारतीय
वाहनांची दुरुस्ती करती कितीक टायरवाले
हायवेला लागून त्या टपऱ्या आणि चहावाले
व्हेज-नॉनव्हेज हॉटेलांची दुतर्फा ती ओळ
गाव आणि शहरी संस्कृतीचा दिसे इथे मेळ
खड्ड्यांमध्ये रस्ता कधी-कधी रस्त्यांमध्ये खड्डा
वडखळ नाका रोजच होई ट्रॅफिकचा अड्डा
पिकती शेती जाऊन आले कारखान्यांचे धुरांडे
स्थानिक आणि परप्रांतीय मजुरांचे लोंढे
शुक्रवारी सुकी मासळी घेण्या गर्दी होते
गावोगावची जनता आठवडा बाजाराला येते
क्षेत्रेश्वर ज्ञानेश्वर मंदिर भजन, कीर्तन चाले
वारकरी परंपरेची पंढरी दिंडी वाट चाले
जयकिसान विद्येचे मंदिर ज्ञान दान करीते
विविधतेतून एकतेचे बीज मनी रुजविते
कटिबद्ध पंचायत इथली ग्राम विकासासाठी
स्वच्छता आरोग्य योजना जनकल्याणासाठी
खारा वारा खाडीवरचा किती वाटे तो गोड
त्यालाही मिळाली आता प्रदूषणाची जोड
रस्त्यावरती लाखो वाहने रुळावर मालगाडी
इथूनच जाई कोकणात ती मजेत झुक झुक गाडी
आगरी, कोळी परंपरा अन् सर्वधर्मसमभाव
वडखळ नाका क्षणभर विश्रांतीचे दुसरे नाव...

- कवयित्री स्मिता सहस्रबुद्धे

# दुर्बीण शस्त्रक्रिया : एक योग्य पर्याय



## परिचय : डॉ. दीपक यशवंत पाटील

दैनिक कृषीवलच्या माध्यमातून सर्वसामान्यांच्या आरोग्य रक्षणासाठी सुरु असलेल्या ‘आरोग्यम् धनसंपदा’ या लेखमालेतील आजच्या लेखात सुप्रसिद्ध स्त्रीरोग व प्रसूतीतज्ज्ञ डॉ. दीपक पाटील यांनी आपल्या प्रदीर्घ अनुभवातून विविध शस्त्रक्रियांविषयी सखोल माहिती दिली आहे. मुळात शस्त्रक्रियेबद्दल सर्वसामान्य रुग्णांमध्ये खूप गैरसमज आहेत. ग्रामीण भागात तर ऑपरेशन म्हटले, की रुग्णांपेक्षा त्याच्या नातेवाईकांमध्ये धडकी भरते, ऑपरेशनसाठी होणारा खर्च त्याचबरोबर त्याचा रिझल्ट याविषयी लोकांमध्ये कायम साशंकता असते. हे गैरसमज व साशंकता दूर करण्याचे अत्यंत महत्त्वाचे काम या लेखामधून निश्चित होणार आहे. डॉ. दीपक पाटील हे स्थानिक असून, अलिबाग तालुक्यातील कुर्डूस-बिडवागळे गावचे रहिवासी आहेत. डॉ. दीपक पाटील यांची हुशारी सेवाभाव, तसेच स्थानिकांबद्दल समाजाविषयी असलेला दयाभाव याचा सर्वांनाच अभिमान आहे. डॉ. दीपक पाटील यांनी के.ई.एम. हॉस्पिटल, मुंबई येथून एम.बी.बी.एस. तसेच उच्च शिक्षण एम.डी. जे.जे. हॉस्पिटल, मुंबई केले आहे. त्यांनी डी.जी.ओ., एफ.सी.पी.एस. (सी.पी.एस. युनिव्हर्सीटी, मुंबई) येथून केले आहे. CEMAST मुंबई येथून ‘लॅपारोस्कोपी व हिस्ट्रोस्कोपी’चे प्रशिक्षण घेतले आहे. मागील १८ वर्षे व ते स्त्रीरोगतज्ज्ञ म्हणून अलिबाग येथे यशस्वीरित्या कार्यरत आहेत. त्यांनी १0 वर्षे अलिबागच्या जिल्हा रुग्णालयात काम केले आहे. सध्या ते अलिबाग येथील ‘पालवी हॉस्पिटल’ येथे स्त्रीरोग व प्रसूतीतज्ज्ञ म्हणून कार्यरत आहेत.










आधुनिक जीवनशैलीमध्ये जेव्हा वेळेला अतिशय महत्त्व आहे व प्रत्येक व्यक्ती लवकरात लवकर आजारातून बाहेर येऊन आपल्या कामात रुजू होण्याचा प्रयत्न करतो. तेव्हा दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया करुन घेण्याकडे वाढता कल दिसत आहे. तरी या सदरात स्त्रीरोगशास्त्रातील दुर्बीण शस्त्रक्रियेबद्दल (Gynaecological Endoscopy) थोडा परिचय करुन घेऊ.

**स्त्रीरोगशास्त्रातील दुर्बीण शस्त्रक्रियेत प्रामुख्याने दोन भाग येतात.**

१) लॅपरोस्कोपी (Laparoscopy)
२) हिस्ट्रोस्कोपी (Hysteroscopy)

**१) लॅपरोस्कोपी (LAPAROSCOPY) :-** लॅपरोस्कोपी म्हणजे पोटात दुर्बीण टाकून केलेली तपासणी. विसाव्या शतकाच्या सुरुवातीपासून पोटात वेगवेगळी साधने टाकून पोटाची तपासणी करण्याची शास्त्रज्ञांनी/डॉक्टरांनी सुरुवात केली. सुरुवातीला दुर्बीणद्वारे पोटांची तपासणी फक्त निदान करण्यासाठीच केली जात होती. कालांतराने दुर्बिणीचा उपयोग करुन कुटुंबनियोजनाच्या, अपेंडीक्सच्या, पित्ताशयाच्या शस्त्रक्रिया होऊ लागल्या. तंत्रज्ञानातील सुधारणा व डॉक्टरांच्या कौशल्यवृद्धीमुळे सिझेरियन शस्त्रक्रिया वगळता पोटाच्या सर्व शस्त्रक्रिया दुर्बिणीद्वारे करणे शक्य झाले आहे.

**लॅपरोस्कोपी शस्त्रक्रिया कशी केली जाते :-** लॅपरोस्कोपी शस्त्रक्रियेदरम्यान पोटावर एक ते चार छिद्रे पाडून कार्बनडायऑक्साईड ($CO_2$) वायू पोटात टाकून शस्त्रक्रियेसाठी जागा निमार्ण केली जाते. छिद्रातून दुर्बीण कॅमेऱ्याला जोडली जाते. कॅमेऱ्यामार्फत मॉनीटरच्या स्क्रिनवर शस्त्रक्रिया प्रक्षेपित केली जाते. स्क्रिनवर पोटातील अवयव पाहून व छिद्रातून वेगवेगळी साधने टाकून ही शस्त्रक्रिया केली जाते.

**लॅपास्कोपीद्वारे होणाऱ्या शस्त्रक्रिया :-**

रोगनिदान करण्यासाठी शस्त्रक्रिया १) ओटीपोटातील दुखणे. २) वैद्यकीय तपासणी, सोनोग्राफी व सीटी स्कॅनद्वारे अचूक निदान होत नसल्यास.

**उपचारासाठी शस्त्रक्रिया :-**

वंध्यत्व निवारण शस्त्रक्रिया, कुटुंबनियोजन शस्त्रक्रिया, गर्भाशयाबाहेरील गर्भधारणा शस्त्रक्रिया, गर्भाशय काढणे, खाली सरकलेले गर्भाशय व योनीमार्ग पूर्वजागेवर आणणे, गर्भाशयाच्या गाठी काढणे, गर्भाशय व बीजांडकोशाच्या कर्करोगाच्या शस्त्रक्रिया, अंतगर्भाशय अस्थान्ता (endometriosis) शस्त्रक्रिया, कुटुंबनियोजन शस्त्रक्रियेची पुनःजोडणी.

**शस्त्रक्रियेनंतर २-३ दिवस होऊ शकणारा त्रास :-**

१) स्नायूदुखी, २) थकवा, ३) मळमळ, ४) खांदेदुखी, ५) टाकेदुखी.

**लॅपारोस्कोपी शस्त्रक्रियेचे फायदे :-**

पोटावरील छेद लहान, कमी वेदना, छोटे व्रण, कामावर लवकर रुजू होता येते. हॉस्पिटलमधील राहण्याचा कालावधी कमी, जंतूसंसर्ग होण्याची शक्यता कमी, शस्त्रक्रियेदरम्यान रक्तस्राव कमी, शस्त्रक्रियेदरम्यान दृश्य मोठे व स्पष्ट असल्याने शस्त्रक्रिया अचूक होते. शस्त्रक्रियेमुळे होणाऱ्या हर्नियाचे प्रमाण अत्यल्प, पोटाची पुनःशस्त्रक्रिया करणे सुलभ, शस्त्रक्रियेचे रेकॉर्डिंग ठेवणे शक्य. त्यामुळे रुग्णांना शस्त्रक्रिया जतन करुन ठेवता येते व डॉक्टरांनाही याचा ज्ञानवृद्धीसाठी उपयोग होतो.

**लॅप्रोस्कोपीची डावी बाजू :-**

१) साधने महाग असल्याने खर्च जास्त येऊ शकतो.
२) डॉक्टर व हॉस्पिटल स्टाफकडे कौशल्याची आवश्यकता.

कधी गरोदर स्त्रीला पोटाच्या शस्त्रक्रियेची गरज भसल्यास लॅप्रोस्कोपी हा योग्य पर्याय असतो. अशा शस्त्रक्रियेसाठी गरोदरपणातील चौथा ते सहावा महिना गर्भासाठी व मातेसाठी जास्त सुरक्षित मानला जातो.

**२) हिस्ट्रोस्कोपी** (HYSTEROSCOPY)

हिस्ट्रोस्कोपी म्हणजे गर्भाशयमुखाद्वारे दुर्बीण टाकून केलेली तपासणी. हिस्ट्रोस्कोपी शस्त्रक्रियेदरम्यान गर्भाशयामध्ये सलाईन किंवा इतर द्रव्य पदार्थ टाकून गर्भाशय फुगवले जाते. याद्वारे दुर्बिणीसाठी व साधनांसाठी जागा केली जाते. ही शस्त्रक्रिया टाकाविरहीत असते.

**हिस्ट्रोस्कोपीच्या विविध शस्त्रक्रिया :-**

न दिसणारी तांबी (copper T) काढणे, गर्भाशयातील गाठी व पडदा काढणे, बंद स्त्रीबीजवाहिनी उघडणे, गर्भाशयाच्या कर्करोगाची तपासणी, मासिक पाळीदरम्यान अतिरक्तस्राव असल्यास व भविष्यात मुल नको असेल, तर गर्भाशयातील आतील आवरण संपूर्णपणे काढून रक्तस्राव कायमस्वरुपी थांबवता येतो. (TCRE-Transcervical resection of endometrium), वंध्यत्व आणि वारंवार होणारे गर्भपात यांचे निदान व उपचार करता येतात. गर्भाशयाला चिकटलेले अस्तर कापणे.

**हिस्ट्रोस्कोपीचे फायदे :-** टाकाविरहीत शस्त्रक्रिया, गर्भाशयाला चिर पाडावी लागत नाही.

**ऑफिस हिस्ट्रोस्कोपी** (office Hysteroscpy)

यात वापरली जाणारी दुर्बीण छोट्या आकाराची असल्याने ही हिस्ट्रोस्कोपीची शस्त्रक्रिया बाह्यरुग्ण विभागात भूल न देता करता येते. **पोटाच्या दुर्बीणशस्त्रक्रिया प्रामुख्याने पूर्ण भूले** (General Anaesthesia) **खाली केल्या जातात.**

**दुर्बीण शस्त्रक्रियेतील नवीन पद्धती :-**

**एक छेद दुर्बीण शस्त्रक्रिया** (Single incision laparoscopie sugery) यामध्ये पोटावर फक्त एकच छिद्र पाडून त्याच छिद्रातून सर्व साधने पोटात टाकून शस्त्रक्रिया केली जाते. फक्त एकच छिद्र असल्याने दुर्बीण शस्त्रक्रियेचे फायदे वाढतात.

**रोबोटिक शस्त्रक्रिया** (Robotic surgery) यामध्ये सर्जन डॉक्टर रुग्णापासून लांब राहून व बसून रोबोटिक हाताद्वारे शस्त्रक्रिया करतात. यामुळे डॉक्टरांना क्षीण कमी येतो व रोबोटिक हात वेगवेगळ्या अंशात फिरत असल्याने शस्त्रक्रियेचा काटेकोरपणा वाढतो.

**रोबोटिक शस्त्रक्रिया :-** (Robotic surgery)

यामध्ये सर्जन एका भागात व रुग्ण वेगळ्या भागात असतो. फायबरऑप्टिक (Fiberoptic)द्वारा अतिजलद संदेश पाठवून शस्त्रक्रिया केली जाते. यामुळे एका देशातील डॉक्टर दुसऱ्या देशातील रुग्णाचीही शस्त्रक्रिया करु शकतात.

**नैसर्गिक छिद्रातून शस्त्रक्रिया :-** यामध्ये पोटावर छेद न देता शरीरातील नैसर्गिक छिद्रे उदा. तोंड, योनीमार्ग, मुत्रनलिका, गुददार याद्वारे पोटाच्या आत दुर्बीण टाकून शस्त्रक्रिया करण्यात येते. यामुळे त्वचेवर कुठेही छेद दिला जात नाही. या प्रकारच्या शस्त्रक्रिया अजूनही प्रायोगिक तत्त्वावर आहेत.

**श्रीकांत पाटील, समन्वयक,**
**‘आरोग्यम् धनसंपदा’**

पान ९ वरुन

## सामाजिक शांततेचा जल्लोषोत्सव!

समाजमनावर आज अनेक प्रकारची दडपणं आहेत. भ्रष्टाचार, भाववाढ, राजकीय अस्थिरता यामुळे कोणीच कोणाचा भरवसा देऊ शकत नाही. आजचा दिवस कसा भागवायचा याची विवंचना मध्यमवर्गीय आणि निम्नस्तरीयांना आहे. बहुतांशी जनता वैयक्तिक, सामाजिक, कौटुंबिक दडपणाखाली जगत आहे. आपापसातले नातेसंबंध प्रचंड तणावाखाली आहेत. त्यामुळे एकमेकांवर दोषारोप करणं, स्वतःचा शक्य तितका स्वार्थ साधण्याचा प्रयत्न करणं, याकडे समाजमन झुकलं आहे. त्याच वेळी प्रत्येकाला शांती, सुख, समाधान मिळवण्याची ओढ लागली आहे. पण, त्यासाठी केवळ आर्थिक बळ हेच साधन असू शकतं का? आर्थिक बळ वाढवण्यासाठी लावलेले योग्य-अयोग्य टेकू माणसाला सुख-शांतीच्या मार्गाकडे घेऊन जाणारे असतील का? त्यासाठी सुरु असलेली शर्यत माणसाला दमवून टाकणारी ठरत आहे. त्याच्या माणूसपणाच्या व्याख्याच बदलून टाकायला लावत आहे. कोणत्याही संस्कृतीचं, समाजाचं अनुकरण करण्यात काय हंशील आहे? प्रत्येक गोष्ट करताना त्यामागचं आदर्श तत्त्व जाणून घेणं गरजेचं आहे. सध्या नाताळची तयारी जोरात सुरू आहे. खरं म्हणजे ‘येशू ख्रिस्त’ आणि आपला ‘कृष्ण’ यांच्यात काही साम्यस्थळं दिसतात. कृष्णाच्या जन्मावेळी वसुदेव-देवकी अतिशय कठीण अवस्थेत तुरुंगात होते. कृष्णापासून असलेल्या मृत्यूच्या भयाने कंसाने त्याला जन्मतःच मारुन टाकण्याचा कट केला होता. ख्रिस्ताच्या जन्माच्या वेळीही त्याच्या मात्या-पित्यांची ससेहोलपट झाली. त्यावेळचा राजा ‘हेरोद’ याने जन्मणाऱ्या मुलाला मारण्याचे अनेक प्रयत्न केले. जन्मल्यानंतर ‘ख्रिस्ता’ला वाचवण्यासाठी त्याच्या आई-वडिलांना देशोदेशी वणवण फिरावं लागलं. ‘योहान’ने (गुरुने) केलेल्या जन्माभिषेकाला येशूची एकाग्रता वाढली. तो ईश्वरी तत्त्वाशी एकरूप झाला. त्याला जणू ‘तत्त्वमसि’चा साक्षात्कार झाला. तो ‘परमेश्वर’मानत असे. ज्याप्रमाणे हवा आपल्याला दिसत नाही, पण सर्वदूर आहे, तिचं असणं आपल्याला जाणवतं; तसेच परमेश्वराचं आहे. परमेश्वर जाणण्यासाठी त्याच्या पातळीपर्यंत मनुष्याने पोहोचले पाहिजे. आपली कुकर्म परमेश्वर पाहात असतो. हे लक्षात ठेवून आपण वागावं, असं तो आपल्या प्रवचनातून सांगत असे. तो उच्च-नीच जातीभेद मानत नसे. ‘शामरोली’ जातीच्या स्त्रीच्या हातचं पाणी त्याने मागून घेतलं. सर्व जाती-धर्म, प्राणी, गुरं-ढोरं सर्वांसाठी पाणी आहे, असा सर्वसमभाव त्याच्या ठायी होता. असा उदारमतवादी येशू लोकाभिमुख होऊन प्रवचनं देत असे.

संत एकनाथ, ज्ञानेश्वर, रामदास यांच्याप्रमाणेच लोकांमध्ये मिसळून येशू तशीच जीवनतत्त्व मांडत असे. येशू करुणाकर होता. पश्चातापाने पापं जळून जातात, यावर त्याची श्रद्धा होती. रामदासांप्रमाणे ‘आपण वचने बोलावी, तैसी उत्तरे येता’ हे जाणून तो वागत असे. ‘येशू’ क्षमाशील होता. सुडाच्या भावनेने सूड धुमसत रहातो. लीनता आणि समर्पण वृत्तीने सुडाच्या मुळाशी घाव घातला जातो, असं त्याचं मत होतं. ज्ञानेश्वरांप्रमाणेच येशूतला ‘मी’ अवघ्या विश्वात समर्पित झाला होता. येशूच्या भवतालच्या तत्कालीन समाजाला सदाचार, सद्भाव, क्षमाशीलता या सद्गुणांची समज देण्याची गरज होती. आज आपल्याकडेही याच सत्प्रवृत्तींची कास धरण्याची गरज आहे. सर्व संत-महात्म्यांनी समाजाला हे विचार दिले आहेत. त्याचं स्मरण ठेवून नाताळ साजरा करताना जल्लोष, उत्साह, आनंदाच्या चैतन्याबरोबरच येशूने दिलेला शांतीचा संदेश आणि क्षमाशील वृत्ती अंगी बाणण्याचा प्रयत्न करू या. ही निर्मळ जीवनतत्त्व जीवनेच्छा नक्कीच ऊबदार बनवतील.

## जीवन व्यापतेय सूक्ष्म तंत्रज्ञान!

**डिजिटल युगात मानवाच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी नवनवीन तंत्रं, साधनं आणि उपकरणं सादर केली जात आहेत. तरीही शारीरिक अवयवांच्या आत काय चालतं हे समजून घेण्यासाठी अप्रत्यक्ष तंत्रपद्धतींची मदत मोठ्या प्रमाणात घ्यावी लागते. सध्या नवतंत्रज्ञानाने सर्व क्षेत्रांमध्ये हातपाय पसरले असले तरी त्यामधल्या विशिष्ट शाखा अधिक वेगाने पुढे सरकताना आढळतात. त्याचाच हा धांडोळा.**






संगणकीय तंत्रज्ञानाने मानवी जीवनाच्या विविध बाजूंना नुसता स्पर्शच केलेला नाही तर त्यामध्ये खोलवर प्रवेश केला आहे, हे आपण सातत्याने अनुभवतोच. या डिजिटल युगात आपलं जीवन सुसह्य करायचं कामही संगणक आणि इतर उपकरणं करत आहेत. मानवाच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी नवनवीन तंत्रं, साधनं आणि उपकरणं सादर केली जात आहेत, हे आपण पाहतो आणि अनुभवतो. तरीदेखील शारीरिक अवयवांच्या आत काय चालतं हे समजून घेण्यासाठी आपल्याला अप्रत्यक्ष तंत्रपद्धतींची मदत मोठ्या प्रमाणात घ्यावी लागते, असं म्हणता येईल. म्हणजे एक्सरे, सोनोग्राफी, एमआरआय, स्कॅनिंग इत्यादी. सध्या नवतंत्रज्ञानाने सर्व क्षेत्रांमध्ये हातपाय पसरले असले, तरी त्यामधल्या विशिष्ट शाखा अधिक वेगाने पुढे सरकताना आढळतात आणि त्यांच्यामुळे इतर शाखांचीही प्रगती होताना आढळते. शरीरावर किंवा शरीरात बसवून वापरण्याजोगी इलेक्ट्रॉनिक साधनं उर्फ ‘वेअरेबल्स’ आणि सूक्ष्म तंत्रज्ञान म्हणजेच ‘नॅनो टेक्नॉलॉजी’. अर्थात, यांचा फायदा व्यावहारिक पातळीवर मिळण्यासाठी तितकीच अचूक उत्पादनपद्धतीही असावी लागते. मात्र, या बाबींचा संयोग झाला तर फक्त वीस एक वर्षांपूर्वी फक्त कल्पनेतच शक्य वाटणाऱ्या नवलाईच्या अनेक बाबी प्रत्यक्षात आलेल्या दिसतात.

संकल्पनेच्या दृष्टीने विचार केला, तर हृदयाच्या बिघडलेल्या कार्यावर लक्ष ठेवणारं पेसमेकर हे उपकरण गेली तीसएक वर्षे वापरलं जात आहेच! हृदयाचे ठोके अनियमित होऊ लागले की संबंधित स्नायूंना विजेचा सौम्य झटका देऊन जागं करणं हे त्याचं काम. परंतु, सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे, नॅनो टेक्नॉलॉजीमुळे आता अशी साधनं इंजेक्शनच्या सुईद्वारे थेट रक्तप्रवाहातही सोडणं शक्य झालं आहे. परिणामी, ही साधनं, गरजेनुसार, संपूर्ण शरीरात प्रवास करू शकतील किंवा विशिष्ट स्नायू वा पेशीजालात बसवता येऊ शकतील. शरीरातल्या विविध अवयवांचं काम ठीक चाललं आहे ना, त्यांना रक्त वा इतर बाबींच्या पुरवठ्यात काही अडथळा नाही ना, हे पडताळण्यासाठी ती अक्षरशः गस्त घालतील, असं म्हणायला हरकत नाही! (अशा प्रकारे शरीरात साधनं सोडण्यावर आधारित ‘फँटास्टिक व्हॉयेज’ आणि ‘इनर स्पेस’ नामक दोन हॉलिवूडपट येऊन गेले आहेत.) काही समस्या आढळल्यास संबंधित चेतापेशी किंवा स्नायूंना तसा इशारा ही साधनं देतील.

कॅन्सर उर्फ कर्करोग हा शब्द उच्चारला की व्यावहारिक पातळीवर कधीही बरा न होणारा दुर्धर आजार, त्यावरची महागडी औषधे व चाचण्या आणि तरीही त्यांच्या परिणामकारकतेबद्दलची अनिश्चितता अशी बरीच लांब साखळी कोणाच्याही मनामध्ये उमटते! अगदी सुरुवातीला लक्षात आलेला कर्करोग बरा होतोही, परंतु त्यासाठी सर्वसाधारणपणे वापरल्या जात असलेल्या चाचण्या, यंत्रणा आणि प्रणाली जरा अपुऱ्या ठरत आहेत, हे सत्य आहे. अलीकडे मात्र, रुजर्स विद्यापीठातल्या संशोधकांच्या एका संघाने (यामध्ये भारतीय आणि मराठीही व्यक्ती आहेत) कर्करोगाला कारणीभूत ठरणारे ‘ट्यूमर’ वेळेवरच शोधून काढण्याची एक नवी पद्धत विकसित केली आहे. कॅन्सर म्हणजे काय किंवा तो कसा होतो याबद्दल आपल्याला माहिती असतेच.

नवतंत्रज्ञानाच्या सर्वांगीण प्रगतीमध्ये, यापूर्वी म्हणजे विसाव्या शतकात फारशा हाती न आलेल्या, नॅनो टेक्नॉलॉजी उर्फ सूक्ष्म तंत्रज्ञान या शाखेची विलक्षण प्रगती झाली आहे आणि तिचे विविध फायदे अंतराळ - संशोधनापासून धान्योत्पादनापर्यंत दिसत आहेत. वैद्यकीय शास्त्रंही याला अपवाद नाहीत. अगदी सुरुवातीच्या, प्राथमिक स्थितीतल्या कर्करोगाचाही छडा लावण्याचा काही तरी मार्ग शोधण्याची आमची बरेच दिवस महत्त्वाकांक्षा होती. आता आमचं हे स्वप्न प्रत्यक्षात आणणं शक्य झालं आहे, असं संबंधित शास्त्रज्ञ प्रभास मोघे यांचं म्हणणं आहे. शरीराच्या कोणत्याही भागात दडून बसलेल्या कर्करोगग्रस्त पेशींना हे सूक्ष्मकण, तिथपर्यंत पोहोचून, शोधून काढू शकतात. असं या प्रकल्पातले आणखी एक शास्त्रज्ञ विद्या गणपती यांनी सांगितलं आहे. ग्रस्त पेशींचा मागोवा घेण्याचं आणि त्यांच्या प्रतिमा डॉक्टरांना पुरवण्याचं हे काम थेट म्हणजे रिअल टाइममध्ये केलं जात असल्याने त्यांचा जागेवरच समाचार घेणं शक्य होतं. त्यामुळे कर्करोगाशी संबंधित जगभरातील वैद्यकविश्वामध्ये अभूतपूर्व बदल होऊन या चिवट, वेदनादायक आणि कायमस्वरूपी आजाराशी अधिक कार्यक्षमतेने सामना करणं शक्य होईल, असा दिलासादायक निष्कर्ष काढायला हरकत नाही. कारण, सध्या वापरल्या जाणाऱ्या तंत्रप्रणालींच्या तुलनेमध्ये, हे सूक्ष्म कण कर्करोगग्रस्त पेशींचा छडा काही महिने आधीच लावू शकतात.

हे दुष्टचक्र सूक्ष्मकणांद्वारे भेदलं जाऊ शकतं. कारण, ते अगदी छोट्या गाठीही ओळखू शकतात. कर्करोगग्रस्त पेशींचा शरीरभर हळूहळू, परंतु निश्चितपणे होणारा प्रसार ओळखू येत नसल्याने या आजारावर केल्या जाणाऱ्या शस्त्रक्रियात्मक उपचारांना मर्यादा पडतात आणि त्यांचा पूर्णपणे उपयोग होत नाही, असं स्टीव्हन लिबुटी (रूजर्स कॅन्सर इन्स्टिट्यूटचे संचालक) यांचं म्हणणं आहे. यामुळे औषधोपचार आणि त्यांची एकंदर दिशा ठरवणंही अवघड बनतं. परंतु, या नव्या ‘नॅनो प्रोब्ज’मुळे अशा त्रुटी दूर होऊन कर्करोगग्रस्तांना दीर्घकालीन फायदा होईल, असं मला वाटतं, असंही ते पुढे सांगतात. संगणकीय प्रणालींमुळे उत्पादनपद्धतींमध्ये आमूलाग्र बदल झाला असून, त्याच्या जोडीला नॅनो टेक्नॉलॉजी उर्फ सूक्ष्म तंत्रज्ञानही आल्यामुळे वेग, अचूकता, लवचिकता, अत्यंत छोटा आकार अशा विविध वैशिष्ट्यांचा एकत्रित रुपात उपयोग करणं शक्य होत आहे आणि ज्या वस्तू फक्त वीसएक वर्षांपूर्वी अशक्य वाटत होत्या त्या प्रत्यक्षात येऊ लागल्या आहेत.

deepak@deepakshikarpur.com

**(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)**

## वैचारिक मंथनाचे विषय

पुस्तक
विनायक कुळकर्णी

आदर्श शिक्षिका म्हणून अनेक पुरस्कार प्राप्त, एक विद्यार्थीप्रिय उच्चविद्याविभूषित शिक्षिका संपदा प्रसाद देशपांडे राज्य आणि जिल्हास्तरीय पातळीवरील विविध निबंध लेखन स्पर्धेत तसेच वक्तृत्व स्पर्धेत आवर्जून भाग घेते आणि बहुतेक वेळा बक्षिसे पटकावते. त्या-त्या स्पर्धांच्या निमित्ताने लिहिलेले निबंध आणि वक्तृत्व स्पर्धेत सदर केलेले विचार जेव्हा एकत्रित गुंफले जातात, तेव्हा ‘मंथन’ या वैचारिक लेखसंग्रहांची निर्मिती होते. एकूण सतरा लेखांच्या माध्यमातून वाचकालासुद्धा वैचारिक मंथन करायला लावणारे विषय आणि त्या विषयाची मुद्देसूद मांडणी लक्षात घेता निबंधाला किंवा भाषणाला मिळालेले पुरस्कार किती सार्थ ठरतात, ते वाचकाच्याही लक्षात येते. ‘आकाश आणि समुद्र’ या पहिल्याच ललित लेखात दोघांची अथांगता आणि अमर्यादता दाखवतानाच लेखिकेला भावलेले त्यातील सौंदर्य, भव्यता आणि सामर्थ्य छान सांगितले आहे. आज सावरकारांवरुन देशात सुरु असलेल्या राजकारणाच्या पार्श्वभूमीवर ‘सावरकर एक द्रष्टा’ निबंध वेगळा पैलू उलगडून दाखवतो. समाजात घडणाऱ्या आत्महत्यांच्या बातम्यांमुळे अस्वस्थ झालेली लेखिका आजचा हा आत्महत्येचा प्रश्न भविष्यात येऊच नये, पालक आणि शिक्षक यांनी जाणीवपूर्वक वेळीच प्रयत्न केले, तर भविष्यात आत्महत्या होणार नाही, अशा आशेवर येते.

गर्भातच खुडल्या जाणाऱ्या मुलींच्या भ्रूणहत्याविषयी लेखिका एका निबंधात लिहितानाच दुसऱ्या निबंधात ती मातृगर्भातील कळीचे मनोगत वाचकापुढे मांडते. ‘मै भी अण्णा’सारखा निबंध भ्रष्टाचारावर समाज कोरडे ओढण्यासाठी कसा एकत्र येतो, तर दुसरीकडे सेल्फी घेण्याच्या नादात आपणच आपल्या माणसांपासून नकळत कसे दूर जातोय, हे लेखिका खूपच स्पष्टपणे मांडते. आचार्य अत्रे, विवेकानंद यांच्या विचारांची चर्चा करतानाच साऱ्या विश्वाला बुद्धाच्या शिकवणीची कशी गरज आहे, ते संपदा देशपांडे यांनी छानच समजावून सांगितले आहे.

दक्षिण भारताचे केलेले प्रवास वर्णन असो, की गाय-संस्कृती देवता की कृषीदेवता असा स्फोटक ठरलेला विषय असो, संपदा देशपांडे शब्दबद्ध छान करतात. शालेय /महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना, शिक्षकांना आदर्श निबंध लेखनाचा मार्ग मंथन या पुस्तकातून नक्की मिळेल. शब्दसंपदा हे अवघ्या चाळीस पानांचे पुस्तक मराठी आणि हिंदी कवितांचे पुस्तक संपदा देशपांडे यांचे असून, मराठी कवितेत अनेक विषयांना स्पर्श करतानाच त्यात चारोळीच्या अंगाने जाणाऱ्या हिंदी कविता ट्विटेरीटी या विभागात आहेत. ट्विटरवर वावरताना सुचलेल्या या शब्दरचना आहेत.




**मंथन : लेखिका आणि प्रकाशिका : संपदा देशपांडे**
**पृष्ठे :९२, मूल्य : १३०/-, मोबाईल : ९३२३०९३६३२**

**शब्दसंपदा : लेखिका आणि प्रकाशिका : संपदा देशपांडे**
**पृष्ठे :४०, मूल्य : ६०/-, मोबाईल : ९३२३०९३६३२**

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ MH/MR/RGD/RNP-16/2018-20 (31-12-2020)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, फॅक्स : ०२१४१-२२२७६२. संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / daily.krushival@gmail.com जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com
मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८. रत्नागिरी कार्यालयः प्लॉट न ई/६३८, अभ्युदयनगर, नाचणे रोड, रत्नागिरी, जि. रत्नागिरी. संपर्क : ७७२१०३००६३/८३९०६५००४४. email : ratnagirikrushival@gmail.com
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील** ■ **मुख्य संपादक : प्रसाद वासुदेव केरकर*** (* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)